**नेमणे आहे**

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com



# दैनिक जनता आवाज






अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक ९४ | शुक्रवार, दि. २३ मे २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये


# ... त्यांना प्रत्येक थेंबाची किंमत मोजावी लागेल

## पंतप्रधान नरेंद्र मोदी; पाकिस्तान सीमेजवळील देशनोक येथून देशातील १०३ रेल्वे स्थानकांचे उद्घाटन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बिकानेर : ऑपरेशन सिंदूर नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी पहिल्यांदाच बिकानेरला आले. जिल्हा मुख्यालयापासून २२ किमी अंतरावर असलेल्या देशनोकच्या पलाना येथे झालेल्या बैठकीत मोदींनी सुमारे ४० मिनिटे भाषण दिले. पाकिस्तानच्या प्रत्येक कृतीला योग्य उत्तर दिले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.**

भारतीयांच्या जीवाशी खेळणाऱ्यांना अजिबात सोडले जाणार नाही. भारत अणुबॉम्बच्या धमक्यांना घाबरणार नाही. ज्यांनी भारताचे रक्त सांडले त्यांना त्याच्या प्रत्येक थेंबाची किंमत मोजावी लागेल. त्याआधी गुरुवारी पंतप्रधान मोदींनी पाकिस्तान सीमेजवळील देशनोक येथून देशातील १०३ रेल्वे स्थानकांचे उद्घाटन केले.

बिकानेर-वांद्रे ट्रेनला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. यासोबतच २६ हजार कोटी रुपयांच्या इतर विकासकामांचे पायाभरणी आणि उद्घाटनही करण्यात आले. बिकानेरच्या नल एअरबेसवरून मोदी थेट करणी माता मंदिरात गेले आणि प्रार्थना केली. येथून ते एका जाहीर सभेला संबोधित करण्यासाठी पलाना गावात पोहोचले.

२२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी आमच्या बहिणींचा धर्म विचारून त्यांचे सिंदूर पुसले. पहलगाममध्ये गोळ्या झाडण्यात आल्या, त्या गोळ्या १४० कोटी देशवासीयांच्या हृदयाला भिडल्या. तिन्ही सैन्यांना पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले आणि तिन्ही सैन्याने पाकिस्तानला शरणागती पत्करण्यास भाग पाडले. पहलगाम हल्ल्याला



प्रत्युत्तर म्हणून, आम्ही २२ मिनिटांत ९ सर्वात मोठे दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले. जेव्हा सिंदूर बारूदात बदलतो तेव्हा काय होते हे जगाने पाहिले? पाच वर्षांपूर्वी देशाने बालाकोटमध्ये हवाई हल्ला केला होता. त्यानंतर माझी पहिली जाहीर सभा राजस्थानमध्ये झाली. या शूर भूमीच्या तपश्चर्येमुळेच असा योगायोग पुन्हा घडला आहे की ऑपरेशन सिंदूर नंतर, बिकानेर मध्ये एक सभा होत आहे.

दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी ऑपरेशन सिंदूरने तीन तत्वे मांडली. पहिले, जर भारतावर दहशतवादी हल्ला झाला तर त्याला योग्य उत्तर दिले जाईल. वेळ आपल्या सैन्याने ठरवली जाईल, पद्धत देखील आपल्या सैन्याने ठरवली जाईल आणि परिस्थिती देखील आपल्याच असतील. दुसरे म्हणजे, भारत अणुबॉम्बच्या धमक्यांना घाबरणार नाही. तिसरे, आपण दहशतवादाचे सूत्रधार आणि दहशतवादाला आश्रय देणारे सरकार वेगळे पाहणार नाही. आपण त्यांचाही असाच विचार करू.

पाकिस्तान कधीही भारताविरुद्ध थेट युद्ध जिंकू शकत नाही. म्हणूनच दहशतवादाला भारताविरुद्ध एक शस्त्र बनवण्यात आले आहे. पाकिस्तान एक गोष्ट विसरला आहे की आता भारतमातेचे सेवक मोदी येथे डोके वर करून उभे आहेत. मोदींचे मन थंड आहे, ते थंडच राहते, पण मोदींचे रक्त गरम आहे. आता मोदींच्या नसांमध्ये रक्त नाही तर गरम सिंदूर वाहत आहे.

प्रत्येक दहशतवादी हल्ल्याची पाकिस्तानला मोठी किंमत मोजावी लागेल, असे भारताने स्पष्ट केले आहे. ही किंमत पाकिस्तानच्या लष्कराला आणि पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेला मोजावी लागेल. जर पाकिस्तानशी चर्चा होईल तर ती फक्त पीओके आणि दहशतवादावरच होईल. भारतीयांच्या रक्ताशी खेळणे पाकिस्तानला महागात पडेल, हा भारताचा निर्धार आहे. जगातील कोणतीही शक्ती आपल्याला या संकल्पापासून रोखू शकत नाही.

## संमिश्र

### तामिळनाडू दारू घोटाळ्याची चौकशी थांबवण्याचे निर्देश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी म्हटले की, ईडीने सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. ती देशाच्या संघराज्य रचनेचे उल्लंघन करत आहे. तामिळनाडू स्टेट मार्केटिंग कॉर्पोरेशन आणि तामिळनाडू सरकार यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने ही टिप्पणी केली. मार्चमध्ये मुख्यालयावर छापा टाकल्यानंतर, एजन्सीने म्हटले होते की त्यांना १,००० कोटी रुपयांचा गैरव्यवहार आढळला आहे. कॉर्पोरेट पोस्टिंग, वाहतूक आणि बार परवाना निविदांशी संबंधित डेटा सापडला आहे. निश्चित किमतीपेक्षा जास्त किमतीत दारूची फसवणूक केल्याचे पुरावे देखील आहेत.

### अखेर वैष्णवीच्या बाळाचा ताबा कसपटे कुटुंबाकडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे :** वैष्णवी हगवणे यांच्या मृत्यूनंतर संपूर्ण महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली आहे. पुरोगामी महाराष्ट्रात सुशिक्षित कुटुंबात देखील हुंडाबळीचा प्रकार घडल्याचे समोर आल्याने संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेंद्र हगवणे व कुटुंबीय यांच्यावर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या दरम्यान वैष्णवीचे ९ महिन्यांचे बाळ कुठे आहे असा सवाल उपस्थित झाला होता. वैष्णवी हगवणे यांचे ९ महिन्यांचे बाळ पुणे येथील कर्वेनगर येथे राहणारे नीलेश चव्हाण यांच्याकडे होते. वारंवार बाळाची मागणी केली असता नीलेश चव्हाण हे बंदुकीला हात लाऊन इथून चालते व्हा, असा दम भरायचे. परंतु आज राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नेत्या रूपाली ठोंबरे यांनी पुढाकार घेऊन बाळाचा ताबा मिळवला आहे. आता हे बाळ वैष्णवीच्या घरच्यांकडे म्हणजे कसपटे कुटुंबाकडे सुपूर्द करण्यात आले आहे.

# सोमनाथ घार्गे अहिल्यानगरचे नवे पोलीस अधीक्षक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** राज्यातील बड्या पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा धडाका सुरु झाला आहे. राज्यात आठ वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. त्यानंतर गुरुवारी २१ वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. पोलीस प्रशासनाच्या निर्णयाने राज्यातील अनेक जिल्ह्यांना नवीन पोलीस अधीक्षक मिळाले आहेत. अहिल्यानगरचे नवीन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे असणार आहेत.

काल, गुरुवारी २१ वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. पोलीस



प्रशासनाच्या बड्या निर्णयाने राज्यातील अनेक जिल्ह्यांना नवीन पोलीस अधिक्षक मिळाले आहेत. अर्चित चांडक यांच्याकडे अकोल्याचे पोलिस अधीक्षकपद सोपवण्यात आलं आहे. तर योगेश कुमार गुप्ता यांची कोल्हापूरच्या पोलिस अधीक्षकपदी नियुक्ती झाली आहे. जयंत मीना यांची लातूरचे नवीन पोलीस अधीक्षक म्हणून नियुक्त झाली आहे.

### कुणाची कुठे बदली झाली?

कोकण विभागातील रत्नागिरी, मराठवाड्यातील धाराशिव आणि लातूर या जिल्ह्यांना नवीन पोलीस अधीक्षक मिळाले आहेत. सोमनाथ घार्गे यांची अहिल्यानगरचे नवीन पोलीस अधीक्षक म्हणून बदली झाली आहे. आंचल दलाल यांची रायगडच्या नवीन पोलीस अधीक्षक म्हणून बदली झाली आहे. साताऱ्याच्या पोलिस अधीक्षकपदावर तुषार दोशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नितीन बगाते यांचे रत्नागिरीच्या पोलीस अधीक्षकपदी नियुक्ती झाली आहे. रितू खोकर यांची धाराशिवचे पोलिस अधीक्षकपदी नियुक्ती झाली आहे.

# नेवाशातील तिरंगा रॅलीतून देशभक्तीचा संदेश: आ. लंघे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आक्रमक पाठिंब्यामुळे भारतीय सैन्याने पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर देत पाणी पाजले आहे. वीर भारतीय जवानांच्या पाठीमागे संपूर्ण भारत उभा असून, पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वावर जनतेचा पूर्ण विश्वास आहे, असे प्रतिपादन आ. विठ्ठलराव लंघे यांनी केले.

नेवासा येथे आयोजित तिरंगा रॅली आणि श्रद्धांजली सभेमध्ये ते बोलत होते. आ. लंघे म्हणाले की, देशभरातून निघणाऱ्या तिरंगा रॅलीद्वारे जवानांच्या पाठीशी असलेला जनसमुदाय दिसून येत आहे. नेवासातील जनतेनेही या माध्यमातून आपल्या देशभक्तीची प्रचिती दिली आहे. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून देशमुख मेजर, धनक मेजर, जावळे मेजर हे उपस्थित होते. प्रास्ताविक भाजपा शहराध्यक्ष मनोज पारखे यांनी केले. मेजर अशोक चौधरी यांनी देखील मनोगत व्यक्त केले

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद



झालेल्या भारतीय जवानांना आणि ऑपरेशन सिंदूरमध्ये हुतात्मा झालेल्या जवानांना यावेळी उपस्थित सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी आ. विठ्ठलराव लंघे, प्रभाकर शिंदे, मनोज पारखे, निरंजन डहाळे, ज्ञानेश्वर पेचे, सचिन देसरडा, तेजश्री लंघे, प्रतापराव चिंधे, ऋषिकेश शेटे, रामभाऊ खंडाळे, उदयकुमार बल्लाळ, अजित नरुला, सतीश मुळे, अशोकराव टेकणे, राजेश कडू, आदिनाथ पठारे मयुर वाखुरे, शोभाताई आलवणे, प्रशांत बहिरट, अमृता नळकांडे, डॉ. मनीषा वाघ आदी उपस्थित होते.

> सिंदूर ऑपरेशनमध्ये शहीद झालेल्या जवानांना आणि बलगाव येथील दुर्दैवी मृत्यू झालेल्या नागरिकांना आपण भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत आहोत. त्यांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही.
>
> **– विठ्ठलराव लंघे, आमदार**

# ... अन्यथा अधिकाऱ्यांना काळे फासणार : संपत बारस्कर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नगर शहरांमध्ये वारंवार खंडित होत असलेल्या वीज पुरवठ्याच्या निषेधार्थ विद्युत भवन येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयातील वीजपुरवठा बंद करून मेणबत्ती पेटवून प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराचा निषेध करण्यात आला. पुढील आठ दिवसांमध्ये विद्युत पुरवठा सुरळीत न

### ग्राहकांकडून दंडेलशाही पद्धतीने वसुली

शहरामध्ये ग्राहकांकडून दंडलशाही पद्धतीने वसुली केली जाते. मात्र त्यांना व्यवस्थित वीज पुरवठा केला जात नाही. मुळाधरण येथे वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्यामुळे शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होत आहे. अधिकारी वर्ग एसी लावून थंड वातावरणात बसतात. मात्र नागरिक गर्मीमध्ये आपली रात्र काढत असतात. नागरिकांनी फोन लावल्यानंतर विद्युत विभागाच्या वतीने कधीही फोन उचलला जात नाही. नागरिकांना मुजोर पद्धतीने उत्तरे दिली जातात. पावसाळ्यापूर्वीच दुरुस्तीचे व झाडांच्या फांद्या तोडण्याचे काम हाती घेणे गरजेचे होते. मात्र कुठल्याही उपयोजना न केल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

**– संपत बारस्कर**



झाल्यास अधीक्षक अभियंता यांना काळे फासण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी दिला.

यावेळी माजी नगरसेवक कुमारसिंह वाकळे, प्रकाश भागानगरे, जिल्हाध्यक्ष सुरेश बनसोडे, वैभव ढाकणे, मंगेश खताळ, संजय सपकाळ, दीपक खेडकर, सारंग पंधाडे, जॉय लोखंडे, रंजना उकिरडे, साधना बोरुडे, आरती उफाडे, स्वप्नील ढवन, महेश गलांडे, गिरीश जगताप, राहुल कातोरे, अंकुश बोरुडे, संकेत कराड, अमोल जाधव, भगवान काटे, अभिषेक बोरुडे, परेश पुरोहित, दिनेश लंगोटे, दीपक लिपाने, संकेत झोडगे, सुरेश आडसूळ, अमित खामकर, अशोक चोभे आदी उपस्थित होते.

> वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्यामुळे व्यापारी, विद्यार्थी, व्यावसायिक यांची अतोनात हाल होत आहे. पावसाचे थेंब सुरू होण्यापूर्वीच वीज गुल होत असते. आठ दिवसांमध्ये वीजपुरवठा नियमित पणे सुरळीत न झाल्यास अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयामध्ये तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल.
>
> **– सुरेश बनसोडे**






# ब्राम्हणवाड्याचे सुपुत्र दहशतवाद्यांशी लढताना शहीद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा गावाचे वीर भूमिपुत्र संदीप पांडुरंग गायकर यांनी भारतीय सैन्याच्या मराठा बटालियनमध्ये सेवा बजावत असताना जम्मू-काश्मीर येथे दहशतवाद्यांशी लढताना देशासाठी वीरमरण आले.

काल पहाटे दहा जणांची तुकडी सीमेवर सैन्यांत आपले कर्तव्य बजावत असताना त्यांच्यावर दहशत वाद्यांनी गोळीबार केला. त्यात जवान संदीप गायकर शहीद झाले आहे. त्याचे दोन सहकारीही गंभीर जखमी झालेले आहेत. शहीद जवान संदीप गायकर यांच्यावर आज अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. संदीप गायकर हे अत्यंत शिस्तबद्ध, कर्तव्यनिष्ठ आणि राष्ट्रप्रेमी सैनिक होते. प्राणांची आहुती



देऊन देशसेवा केली. त्यांच्या बलिदानाने संपूर्ण ब्राम्हणवाडा गाव, अकोले तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे.




# कुटुंब हाच व्यक्ती विकासाचा पाया : संकेत शेगावकर



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** कुटुंब हाच व्यक्ती विकासाचा पाया आणि भविष्य असल्याने कुटुंब व्यवस्था टिकवण्याचा संकल्प सर्वांनी करायला हवा, असे प्रतिपादन मिरॅकल फाउंडेशन इंडिया संस्थेचे प्रशिक्षण सहाय्यक संकेत शेगावकर यांनी केले.

जागतिक कुटुंब दिनाच्या निमित्ताने १८ मे रोजी स्नेहालय संस्थेच्या कुटुंब आधारित सेवा प्रकल्पाच्या वतीने स्नेहालय पुनर्वसन संकुल एमआयडीसी येथे जागतिक कुटुंब दिवस साजरा करण्यात आला. त्यास उद्घाटक म्हणून शेगावकर उपस्थित होते.

संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त राजीव गुजर, संजय बंदिष्टी, संस्थेच्या सचिव डॉ. प्रीती भोम्बे, विश्वस्त सपना असावा, खजिनदार गीता कौर, इंग्लंड येथून अहिल्यानगर येथे स्थायिक होऊन गेली ११ वर्षे स्नेहालय संस्थेलाच आपले कुटुंब मानणारे ज्येष्ठ भारत सेवक निक कॉक्स, येथील विधी सेवा प्राधिकरणाच्या न्यायाधीश भाग्यश्री पाटील आणि स्नेहालय संस्थेतील विद्यार्थ्यांचे नातेवाईक, माजी विद्यार्थी अशांची या कार्यक्रमास उपस्थिती होती.

स्नेहालय संस्थेतील मुले आणि त्यांचे पालक तसेच अनाथ मुलांचे दूरचे नातेवाईक यांच्यामधील प्रेमबंध दृढ करणारे अनेक उपक्रम यावेळी. यावेळी 'कुटुंबाचे महत्व' या संकल्पनेवर आधारित विविध सांस्कृतिक, आणि सामाजिक उपक्रम, स्पर्धा यावेळी झाल्या.

> स्नेहालय संस्था हे एक कुटुंब आहे. संस्थेतील मुले व कर्मचारी हे सर्व एका कुटुंबांप्रमाणेच एकत्रित राहतात. मुल संस्थेमध्ये राहत असेल तरी त्याला हक्काच्या एका कुटुंबाची गरज असतेच. कुटुंबाचे प्रेम माया व जिव्हाळा प्रत्येक मुलाचा अधिकार आहे.
>
> **– गिरीश कुलकर्णी**

# संजीवनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी कृतिबध्द

## 'संजीवनी पॅटर्न' पालकांना भावतोय; पाच विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** या महाकाय विश्वात पालकांची सर्वात मौल्यवान संपत्ती म्हणजे त्यांची संतती. आपला पाल्य या महाकाय विश्वात स्थिर स्थावर व्हावा, स्वावलंबी व्हावा, त्याला नोकरी मिळावी, ही पालकांची माफक अपेक्षा असते. या अपेक्षेने पालक आपल्या पाल्यांना संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजमध्ये दाखल करतात. कॉलेजचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट डिपार्टमेंट विविध कंपन्यांच्या संपर्कात राहुन कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करते. अशाच प्रयत्नातुन अलिकडेच किर्लोस्कर न्युमॅटिक कंपनीने चार व बिझिनेस नेक्स्ट कंपनीने पाच विद्यार्थ्यांची चांगल्या वार्षिक पॅकेजवर नोकरीसाठी निवड केली आहे. अशा प्रकारे संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजने आपल्या विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये नोकरी मिळवुन देण्याचा ध्यास कायम ठेवला असुन पालकांचे स्वप्न पुर्ण होत आहे, अशी माहिती महाविद्यालयाने प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

किर्लोस्कर न्युमॅटिक या यांत्रिकी उत्पादनाच्या क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीने मेकॅनिकल इंजिनिअरींगच्या अंतिम वर्षातील क्रिष्णा संजय राऊत, सहर्ष उमेश गुंजाळ, ऐश्वर्या मनोज कुंभार व कार्तिक राजेंद्र पवार यांची नोकरीसाठी निवड केली.

निवड झालेले सर्व विद्यार्थी ग्रामीण भागातील आहे. संजीवनीच्या प्रयत्नाने ग्रामीण विद्यार्थी नोकरदार बनत आहेत. यामुळे पालक वर्गात मोठे समाधान आहे. अनेक पालक व्यवस्थापन, डायरेक्टर व संबंधित विभाग प्रमुख आणि शिक्षकांना भेटून महाविद्यालयाच्या प्रयत्नांबद्दल आपला अभिप्राय व्यक्त करतात. संजीवनीच्या सर्वच संस्था विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी कृतिबध्द कार्यक्रम राबवितात, त्यामुळे 'संजीवनी पॅटर्न' पालकांना अधिक भावत आहे, असे पत्रकात शेवटी म्हटले आहे.

### या विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड

- बिझिनेस नेक्स्ट या जगभरातील बॅन्का आणि वित्तिय संस्थांना सॉफ्टवेअर सपोर्ट करणाऱ्या कंपनीने अंतिम वर्षातील कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या ऋतुजा शिवाजी बेंद्रे, देवांशी लोकेश गुप्ता, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीच्या स्वराज शशिकांत लांडे, अक्षदा सोमनाथ चव्हाण व इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या ऋषिकेश भाऊसाहेब दुबे यांची नोकरीसाठी निवड केली आहे.

### कोल्हेंकडून यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन

- संजीवनीचे अध्यक्ष नितिन कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# कोपरगाव बस स्थानकात वाहकास जबर मारहाण



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव शहर :** कोपरगाव बस स्थानकात संगमनेर बस आगाराच्या बसमध्ये आरडाओरड चालू असल्याने यास त्या बसचे वाहक प्रदीप भाऊसाहेब दातीस यांनी सदर आरडाओरोड करणाऱ्या रवींद्र भाऊसाहेब घारे (रा. समता नगर, कोपरगाव) यांना तू आरडाओरड का करतो, असे विचारण्याचा राग आल्याने त्याने सदर वाहकाची गच्ची धरून सरकारी कामात अडथळा करून तसेच वाहकास ओढून धक्काबुक्की केली व शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली.

तसेच या मारहाणीत सदर वाहक हे गाडीत पडल्याने वाहकाच्या डाव्या हाताच्या अंगठ्याला मार लागला असून उजव्या डोळ्याच्या भुईवर जखम झाल्याने रक्तप्रवाह येत असल्यामुळे सदर वाहकास चालकाने कोपरगाव बस आगारातील कंट्रोल केबिनमध्ये घेऊन गेले असता रवींद्र घारे यांनी तेथे येऊन देखील शिवीगाळ व दमदाटी केली या मजकुराच्या आधारे कोपरगाव शहर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे. सदर घटनेचा पुढील तपास कोपरगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक भगवान मथुरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल बी एच तमनर हे करीत आहे.

# विद्यार्थ्यांनी भविष्य हे घडवायचे असते : बनकर



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव शहर :** कोपरगाव शाखेच्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने इयत्ता १० वी, १२ वी गुणवत्ता विद्यार्थी यांच्या छात्र गौरव कार्यक्रमाचे आयोजन कोपरगाव विद्यार्थी सहाय्यक सभागृहात करण्यात आले होते. खऱ्या अर्थाने भविष्य हे आपोआप घडत नसते.

ते जिद्द, मेहनत आणि पालकांशी समन्वय ठेवून योग्य दिशा घेत घडवायचे असते, असे मार्गदर्शन शिक्षणतज्ञ विजय बनकर यांनी कोपरगाव येथील अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने इयत्ता १० वी, १२ वी गुणवत्ता विद्यार्थी यांच्या छात्र गौरव कार्यक्रमाप्रसंगी केले.

यावेळी विद्यार्थ्यांना तज्ञ मार्गदर्शक म्हणून शिक्षणतज्ञ विजय बनकर, कोपरगांव वकील संघाचे माजी अध्यक्ष ड. मनोहर येवले, स्वच्छतादूत सुशांत घोडके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

उपस्थित विद्यार्थी यांना प्रमाणपत्र आणि गुलाब पुष्प देवून गौरवण्यात आले.

यावेळी विशाल होन, विजय पगारे, हेमंत सुर्यवंशी, रवि मोकाशे, प्रीतम कापसे, ड. ज्ञानदेव खेडकर, अभिषेक ठावरे, राहुल पाटील, श्रेया शिरोडे, अजय शेंडकर, स्वराज खरात यांच्यासह अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक रवि मोकाशे यांनी केले. तर सुत्रसंचालन श्रेया शिरोडे यांनी केले. तर सदरच्या कार्यक्रमाची सांगता सामुदायिक वंदे मातरम् गीताने झाली.

> लाकडाचा ओंडका प्रवाहाच्या दिशेने वाहत जातो. त्याला कोणत्या किनाऱ्यावर न्यायचे हे प्रवाह ठरवतो. मात्र जिवंत माणूस हा प्रसंगी झटपट किनाऱ्यावर जाण्यासाठी प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने पोहोतो. आपल्याला पुढील वाटचालीत योग्य दिशा समजून घ्यावी लागेल. तुम्ही जे करत आहात त्यात तुम्ही समाधानी असल्याची स्वतः खात्री करा. भविष्यासाठी स्वतःला घडवायचे आहे.
>
> **– विजय बनकर**

# भगवान विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न

**जुन्या आठवणींना दिला उजाळा; दहावीतील १९९५ बॅचच्या विद्यार्थ्यांची भरली शाळा**



**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी येथील इयत्ता दहावी १९९५ ची बॅचच्या शाळेचे माजी विद्यार्थी यांनी एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी श्री भगवान विद्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष परदेशी यांनी केले. तर त्यांना अनुमोदन बाळासाहेब देवडे, शंकर भाकरे, जालिंदर जाधव, गोधाजी शिंदे, संतोष शिंदे, बाळासाहेब चोरमल, पांडुरंग शिंदे यांनी केले.

कार्यक्रमाचे आयोजन अंकुश शिंदे, विलास वाघुंबरे यांनी केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद डेरे, संदीप जाधव यांनी केले. याप्रसंगी निवृत्त शिक्षक मुळे, माजी मुख्याध्यापक मुळे, राठोड, जगताप, धुलवडे, आंधळे, मापारे, निकाळजे, शिंदे आदी शिक्षक उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी विनोद ढेरे, विश्वास वाघुंबरे, शंकर भाकरे, अंकुश शिंदे, मेजर संतोष परदेशी, बाळासाहेब देवडे, रामदास सोनवणे, किरण गोंधळी, रुपेश संकलेच्या, रामेश्वर विखे, नानासाहेब गरड, ज्ञानेश्वर घाडगे, अशोक भिसे, जालिंदर जाधव, संतोष शिंदे, शरद काकडे, हरिश्चंद्र गरड, चंद्रकांत भवर, संजय भवर, राजू शेख, संतोष खोसे, आबासाहेब गलवर, राजाभाऊ देशमुख आदी माजी विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

> शालेय जीवनातील शिक्षण पद्धती आणि सध्याची शैक्षणिक पद्धती यामध्ये अमुलाग्र बदल झाला असून सध्या कॉम्प्युटर मोबाईलच्या माध्यमातून उच्च शिक्षण घेणे सोयीचे झाले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी देखील शिक्षणामध्ये परिवर्तन करून मजल मारली आहे.
>
> **– निवृत्त शिक्षक मुळे**

# नगर कॉलेजच्या एफवायबीसीएसच्या विद्यार्थ्यांचे परिक्षेत यश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** अहमदनगर महाविद्यालयाच्या एफ. वाय.बी.सी.एस. (प्रथम वर्ष बॅचलर ऑफ कॉम्प्युटर सायन्स) विभागातील विद्यार्थ्यांनी नुकत्याच झालेल्या विद्यापीठाच्या परिक्षेत उल्लेखनीय यश मिळवले आहे.

गुणवत्तेच्या निकषांवर आधारित या निकालात विद्यार्थ्यांनी उच्च श्रेणी प्राप्त करून महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे. या परीक्षेध्ये खान अज़ीम मुनाफ याने ९.७३ गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे.

त्याचबरोबर रुद्रप्रताप सिंग (९.६४ गुण), अभिनव बाबासाहेब लोंढे (९.५५ गुण) आणि गवळी तेजस कानीफनाथ (९.५५ गुण) यांनीही उत्तम गुण मिळवत गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. त्यांचे भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा. यावेळी विभागप्रमुख प्रा. दलीपकुमार भालसिंग, डॉ. सय्यद रज्जाक उपस्थित होते.

# 'प्रवरा'च्या ऑनलाईन प्रवेश सुविधा मार्गदर्शन केंद्र सुरू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालयाच्या वतीने पॉलिटेक्निकमध्ये प्रथम वर्ष प्रवेशासाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. पद्मश्री विखे पाटील पॉलिटेक्निक येथे केंद्रीभूत ऑनलाईन प्रवेश सुविधा व मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले असल्याची माहिती प्राचार्य डॉ. विजयकुमार राठी यांनी दिली.

१० वी आणि १२ वीच्या परिक्षांचा निकाल जाहीर झाला आहे. डिप्लोमा प्रवेशासाठी विद्यार्थ्यांकडून राज्याच्या केंद्रीभूत ऑनलाईन प्रवेश नोंदणी अर्ज स्विकारले जात आहेत. प्रथम वर्ष प्रवेश नोंदणी दि. २० मे ते १६ जून २०२५ पर्यंत ऑनलाईन प्रवेश नोंदणीसाठी मुदत आहे. लोणी येथील प्रवेश मार्गदर्शन केंद्रामध्ये तज्ञ मार्गदर्शक उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांना प्रवेशासंबंधीची सविस्तर माहिती, नियम, ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरणे, पसंती क्रमांक देणे सहजसुलभ होणार आहे.

### त्वरित संपर्क साधा

- प्रवेश सुविधा केंद्रासाठी स्वतंत्र अद्ययावत प्रवेश व मार्गदर्शन कक्ष स्थापन केला आहे. विद्यार्थ्यांनी माहितीसाठी प्राचार्य डॉ. विजयकुमार राठी ७७२२०९१२७७ आणि एफ सी सेंटर प्रा. वसिम तांबोळी ९०४९०८४७८६, प्रथम वर्ष समन्वयक ९८८१९२१०४३, द्वितीय वर्ष प्रा. एन. एम. गरड ९८९०८४४७७४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

# 'आत्मा मालिक'चा करण चरवंडे राज्यात प्रथम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद व आर टी एस सी फाउंडेशन यांच्यावतीने घेण्यात येणाऱ्या रॅशनॅलिस्ट टॅलेंट सर्च परीक्षेमध्ये 'आत्मा मलिक सेमी इंग्लिश मीडियम गुरुकुलाने सलग चौथ्या वर्षी राज्यात प्रथम येण्याचा मान मिळवला.




करण चरवंडे याने राज्यात प्रथम तर श्रेयश भवर जिल्ह्यात प्रथम व तन्वेष भोई याने जिल्ह्यात तृतीय क्रमांक पटकावला आहे.

या सर्व विद्यार्थ्यांना प्राचार्य निरंजन डांगे, विभाग प्रमुख सचिन डांगे, पर्यवेक्षक गणेश रासने, विषय शिक्षक राजेंद्र जाधव, पंकज गुरसळ, सुवर्णा ढगे, विद्या खोसे, रीना कोरे, भैरवनाथ कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे ट्रस्टचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, उपाध्यक्ष बाळासाहेब गोरडे, सरचिटणीस हनुमंतराव भोंगळे, कोषाध्यक्ष विठ्ठलराव होन, विश्वस्त प्रकाश गिरमे, प्रदीप कुमार भंडारी , शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक, वसतीगृह व्यवस्थापक साईनाथ वर्पे आदिंनी अभिनंदन केले.

> आत्मा मालिक सेमी इंग्लिश मीडियम गुरुकुल, कोकमठाण सर्व स्पर्धा परीक्षांसह, प्रवेश परीक्षा, प्रज्ञाशोध परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये राज्यात अव्वल स्थानावर असून ही केवळ शाळा नाही तर ही एक विद्यार्थ्यांचे गुणवत्तापूर्ण, सुसंस्कारित, सर्वगुणसंपन्न, सर्वांगसुंदर व्यक्तिमत्त्व घडविणारी तपोभूमी आहे.
>
> **– निरंजन डांगे, प्राचार्य**

# दहावीत ९८.४० टक्के गुण मिळवत देवयानी साळुंके शाळेत द्वितीय

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** समतानगर, टीव्ही सेंटर येथील देवयानी शेखर साळुंके हिने दहावीत ९८.४० % गुण मिळवत शाळेत दुसरा क्रमांक आणून तिने यश संपादन केले आहे.



साळुंके ही अशोकभाऊ फिरोदिया माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेची ती विद्यार्थिनी असून, तिने अभ्यासात सातत्य आणि चिकाटी ठेवत हे यश मिळवले. तिच्या यशात शाळेतील शिक्षकांचे, पालकांचे योगदान आहे. तिच्या यशाबद्दल शिक्षक, नातेवाईकांकडून कौतुक होत आहे.

# झाडाला गळफास घेत एकाची आत्महत्या

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** घराच्या बाजूला असलेल्या झाडाला गळफास घेऊन ३८ वर्षीय इसमाने आत्महत्या केल्याची घटना २१ मे रोजी सकाळी ६ वाजण्याच्या सुरास पाईपलाईन रोडवरील शिलाविहार कॉलनी येथे घडली. महादेव शिवाजी वाघ असे मयत व्यक्तीचे नाव आहे.

महादेव वाघ यांनी गळफास घेतल्याचे निदर्शनास येताच त्यांची पत्नी प्रियंका वाघ यांनी त्यांना तातडीने उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून ते उपचारापूर्वीच मयत झाले असल्याचे घोषित केले. याप्रकरणी जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. वाघ यांनी दिलेल्या माहितीवरुन तोफखाना पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृत महादेव वाघ यांच्या पार्थीवावर श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, दोन मुले, दोन भाऊ असा परिवार आहे.

# आ. तांबेंच्या हस्ते ढोलेंना पुरस्कार प्रदान

## राज्यातून निवडण्यात आलेल्या १० शिक्षकांमधून प्रा. अशोक ढोले यांची झाली निवड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी बद्दल महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघातर्फे दिला जाणारा पुणे जिल्हा हिंदी आदर्श शिक्षक पुरस्कार शेवगाव तालुक्याचे भूमिपुत्र प्रा. अशोक ढोले यांना नाशिक पदवीधर मतदार संघाचे आ. सत्यजित तांबे यांच्या हस्ते यांना प्रदान करण्यात आला.



याप्रसंगी त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष साहेबरावजी घाडगे पाटील, महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघाचे अध्यक्ष मिलिंद कांबळे, सचिव रेवणनाथ कर्डिले, पुणे विभागाच्या अध्यक्ष डॉ. नेहा बोरसे उपस्थित होते.

अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान येथे महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघाची द्विदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली.

या प्रसंगी हा पुरस्कार देण्यात आला आहे. अशोक ढोले हे शेवगाव तालुक्यातील आव्हाने येथील भूमिपुत्र असून ३ री ला असताना त्यांच्या आईचे निधन झाले. त्यानंतर खूप हालाकीच्या परिस्थितीत त्यांचे शिक्षण त्यांनी स्वतःच कष्ट करून पूर्ण केले. याबद्दल त्यांचे, सिंबायोसिस कॉलेजच्या प्राचार्या टेसी थडतील, उपप्राचार्य ऋचा फोंडगे व सहकारी प्राध्यापक यांनी अभिनंदन केले आहे.

### दहा शिक्षकांमधून ढोलेंची निवड

- सध्या ते पुण्यातील सिंबायोसिस या नामांकित महाविद्यालयामध्ये गेल्या २० वर्षापासून अध्यापनाचे पवित्र कार्य करत आहेत. त्यांनी मागील वर्षी भारत सरकार, सांस्कृतिक मंत्रालयातर्फे हैदराबाद येथे 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' यावर २१ दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे. यासाठी महाराष्ट्र राज्यातून निवडण्यात येणाऱ्या १० शिक्षकांमध्ये त्यांची निवड झाली होती.

# गोव्यातील धर्मपरिषदेला सागर बेग यांची भेट

## २५ हजार समुदायाची उपस्थिती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : जगातील पंधरा देशात विस्तारलेल्या एक हजार सनातन संस्थांच्या शाखांमधून तब्बल पंचवीस हजार जणांच्या उपस्थित गोव्यातील फोंडा याठिकाणी तीन दिवस झालेल्या भव्य धर्मपरिषदेत अध्यक्ष सागर बेग यांनी राष्ट्रीय श्रीराम संघाचा भगवा ध्वज फडकावून उपस्थिती दर्शवली.

हिंदू धर्म रक्षणार्थ गोवा येथे १९९९ साली स्थापित झालेल्या सनातन या हिंदू अध्यात्मिक संस्थेचे भारतासह संपूर्ण जगात देव देश आणि धर्माचे एकतर्फी कार्य एक हजार शाखांच्या माध्यमातून अविरतपणे चालू आहे. संपूर्ण जगात वाढलेला आतंकवाद विरोधात आणि हिंदू धर्मियांच्या अस्तित्वासाठी सनातनचा लढा अव्याहतपणे चालू आहे. आज भारतात हिंदुत्ववादी वातावरण चांगलेच गरम झालेले आहे, असे असताना सर्व धर्मप्रसारक, धर्मप्रचारक, धर्मरक्षकांचा समन्वय घडून यावा, त्या सर्वांचा एकाच छताखाली मान्यवरांकडून धर्मरक्षणाचे धडे मिळावेत, यासाठी सनातन संस्थेने गोव्यातील फार्मागुडी फोंडा याठिकाणी शेकडो एकराच्या विस्तीर्ण परिसरात दिनांक १७ ते १९ मे पर्यंत तीन दिवस धर्मपरिषदेचे आयोजन केले होते. हिंदू धर्मरक्षक व राष्ट्रीय श्रीराम संघाचे अध्यक्ष सागर बेग यांना जिल्ह्यातून विशेष आमंत्रित करण्यात आल्याने राष्ट्रीय श्रीराम संघाच्या माध्यमातून सागर बेग यांच्या धर्मकार्याची दखल राज्याबाहेरही गेल्याचे मानले जात आहे.

### परिषदेत यांचे लाभले मार्गदर्शन

अध्यात्मिक क्षेत्रातून श्री. श्री. रविशंकरजी, स्वामी गोविंदेवगिरीजी महाराज, स्वामी रविंद्रगिरीजी, आचार्य स्वामी बालकानंदगिरीजी, जगदगुरु रामानंदचार्य राजराजेश्वर माऊली, महंत राजू देशजी (हनुमानगढ अयोध्या), पद्मश्री सदगुरू ब्रम्हास्वरानंद महाराज, देवकानंद ठाकूर महाराज यांचे आध्यात्मिक मार्गदर्शन उपस्थितांना याप्रसंगी लाभले.

गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, छत्तीसगढचे मुख्यमंत्री विष्णू देवसहाय, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, तेलंगणाचे आमदार टी राजा उर्फ राजाभैया, सुदर्शन न्यूज चॅनलचे मुख्य सुरेशजी चव्हाणके यांचेही भाषणे याप्रसंगी झाले. धर्मपरिषदेत प्रत्येक दिवशी मान्यवरांचे अध्यात्मिक विचारांबरोबरच हिंदुत्ववादी प्रखर विचार ऐकायला मिळणे हे भाग्याचे असल्याची प्रतिक्रिया सागर बेग यांनी यावेळी दिली. या धर्म परिषदेस सागर बेग यांच्या बरोबर राष्ट्रीय श्रीराम संघाचे खंदे समर्थक नेवासा तालुका अध्यक्ष संकेत चव्हाण, महेश जरे, राहाता तालुकाध्यक्ष मदन मोकाटे यांनी देखील धर्मपरिषदेत सहभाग नोंदवला.




# नवीन जोडप्यांच्या हस्ते झाडांचे वृक्षारोपण



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : जय हिंद फाउंडेशनच्या वतीने एक अभिनव उपक्रम राबवत निर्मलनगर येथे विवाहानिमित्त ११ झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. वैभव संजय आव्हाड आणि निकिता यांचा विवाह सोहळा नुकताच पार पडला. या सोहळ्याला केवळ पारंपरिक स्वरूप न देता पर्यावरण संवर्धनाची जोड देत, आंबा, आवळा, लिंब अशा ११ झाडांचे वृक्षारोपण या नवविवाहित जोडप्याच्या हस्ते करण्यात आले.

या उपक्रमात परिसरातील अनेक मान्यवर आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला. यावेळी जय हिंद फाउंडेशनचे शिवाजी पालवे, बबनराव पालवे, जगन्नाथ जावळे, दिनकर गिते, ज्ञानदेव चेमटे, संजय सानप, सुरेश दहिफळे, बाबासाहेब आव्हाड, मोहनराव आव्हाड, अश्रुबा पालवे, अर्जुन बडे, बळवंतराव पालवे, निवृत्त पोलीस अधिकारी श्याम जावळे, हरिश्चंद्र बडे, पप्पू गिते, राजेंद्र शेकडे, जय भगवान महासंघाचे संजय आव्हाड, सुमित डमाळ, ज्ञानेश्वर बडे, भारती डमाळ, ओंकार काकडे, पूनम खेडकर, शितल बुधवंत, आशा आव्हाड, रंजना बडे, पूजा दहिफळे आदी उपस्थित होते.

शिवाजी पालवे यांनी पावसाळा लवकर सुरू होत असल्याचे सांगून अधिकाधिक वृक्ष लागवड करण्याचे आवाहन केले. वृक्ष लागवड ही केवळ निसर्ग रक्षणाचे साधन नसून, भावी पिढ्यांसाठी शुद्ध हवा, पाणी आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्याचा एक प्रभावी मार्ग असल्याचे त्यांनी सांगितले.

# फेरसर्व्हे केल्याशिवाय काम सुरु होणार नाही

## मुख्याधिकारी घाडगे; पाणी योजनेसंदर्भात शेवगाव कृती समितीची बैठक संपन्न

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : फेरसर्व्हे केल्याशिवाय नवीन पाणी योजनेचे काम सुरूवात होणार नाही, असे आश्वासन मुख्याधिकारी विजय घाडगे यांनी कृती समितीच्या बैठकीत दिले.

शेवगाव शहरामध्ये होऊ घातलेल्या नवीन पाणीपुरवठा योजनेच्या संदर्भात शेवगाव नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी विजया घाडगे यांनी शेवगाव पंचायत समितीच्या मारुतराव घुले पाटील सभागृहामध्ये शेवगाव कृती समितीच्या सदस्यांची काल बैठक आयोजित केली होती. यामध्ये शेवगाव शहरात होऊ घातलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या अनेक त्रुटी व त्यावर उपाययोजना या संदर्भात अधिकारी, ठेकेदार व कृती समितीची सदस्य यांच्यामध्ये चर्चा झाली. या चर्चेमधून ज्या त्रुटी समोर आल्या त्या त्रुटीवर उपाययोजना व पाईपलाईनचा फेरसर्वे केल्याशिवाय पुढील पाईपलाईन टाकण्याचे काम बंद करा, अशी मागणी कृती समितीचे सदस्य अरुण मुंढे व किसन चव्हाण यांनी केली, यावर सविस्तर चर्चा होऊन शेवगाव नगर परिषदेच्या मुख्याधिकारी घाडगे यांनी पाणी योजनेचा फेरसर्वे केल्याशिवाय पुढील काम करण्यात येणार नाही अशी ग्वाही दिली. व त्यानंतर या बैठकीचा समारोप करण्यात आला.

या चर्चेमध्ये शहरातील अनेक पदाधिकाऱ्यांनी भाग घेतला व शेवगाव मधील विविध प्रभागामध्ये चाललेल्या पाणी योजनेच्या बाबत तक्रारी केल्या व यावर ठेकेदार यांनी उत्तरे देत आलेल्या तक्रारींची दखल घेऊन याबाबत चौकशी करून दुरुस्ती केली जाईल असे सांगितले.

### बैठकीस यांची होती उपस्थिती

बैठकीस शेवगाव कृती समितीचे सदस्य व भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अरुण मुंढे, वंचित बहुजन आघाडीचे राज्य सचिव प्रा. किसन चव्हाण, शेवगाव पंचायत समितीचे माजी उपसभापती अरुण लांडे, शेवगाव नगर परिषदेच्या मुख्याधिकारी विजया घाडगे, शेवगावचे माजी उपनगराध्यक्ष वजीर पठाण, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय फुंदे, शिव-सेनेचे एकनाथ कुसळकर, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष प्यारेलाल शेख, डॉ. अमोल फडके,कमलेश गांधी, हरीश भारदे आदी उपस्थित होते.



# ‘गुरूंच्या आगमनाने भक्तांची दिवाळी’



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : ज्याप्रमाणे आयोध्यामध्ये राम येतात, तेव्हा दिवाळी होती. श्रीरामपूरात गुरुंचे आगमन होते, तेव्हा भक्तांची दिवाळी साजरी होते, असे प्रतिपादन भक्ताम्बरवाले बाबा ज्योतिषाचार्य डॉक्टर आचार्य प्रणाम सागरजी महाराज यांनी केले.

भक्ताम्बरवाले बाबा ज्योतिषाचार्य डॉक्टर आचार्य प्रणाम सागर जी महाराज यांचे शहरात गुरुवारी सकाळी आगमन झाले. त्यांचे स्वागत बेलापूर रोडवर करण्यात आले. यावेळी समाज बांधवांनी चौका चौकामध्ये महाराजांचे स्वागत केले. लोकमान्य टिळक वाचनालयासमोर असलेल्या आचार्य विद्यासागरजी महाराज यांच्या प्रेरणेतून उभारण्यात आलेल्या कीर्ती स्तंभाचे त्यांनी दर्शन घेतले.त्यानंतर दिगंबर जैन मंदिरात आचार्य प्रणाम सागरजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली भगवंताचे अभिषेक व पूजन झाले. यावेळी ते बोलत होते. समवेत १०५ शिल्लक जी प्रथम सागर यांच्यासह ब्रह्मचारी भैय्या उपस्थित होते.

यावेळी समाजाचे अध्यक्ष संजय कासलीवाल विश्वस्त एडवोकेट सुभाष चुडीवाल, गुलाब झाजरी, जितेंद्र कासलीवाल, मयूर पाटणी, महावीर काला, पंकज पांडे, बहु मंडळाचे संगीता कासलीवाल,चंदना महिला मंडळाचे रेखा पाटणी, शांतीसागर पाठशाळाचे प्रमुख प्रिया अग्रवाल, वीर सेवादलाचे प्रितम पांडे, पंचाअमृत ग्रुप, बहु मंडळ, महावीर युवा मंच आदीसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# वीजपुरवठा सुरळीतसाठी नागरिकांचे आंदोलन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने विविध विकासाच्या योजना राबवून अत्यंत वैभवशाली व सुरक्षित शहर म्हणून संगमनेरची राज्यात ओळख निर्माण झाली आहे. मात्र मागील काही दिवसांपासून महावितरण कार्यालयाकडून सातत्याने अनियमित, खंडित होणारा वीजपुरवठा केला जातो. यामुळे अनेक नागरिक त्रस्त झाले आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांचा रोष वाढत असून तातडीने यावर उपाययोजना कराव्यात, या मागणीसाठी आज नागरिकांनी एमएसईबी कार्यालयाला निवेदन दिले.

संगमनेर नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. यावेळी सोमेश्वर दिवटे, गजेंद्र अभंग, किशोर टोकसे, नूरमोहम्मद शेख, नितीन अभंग, संतोष मुर्तडक, जा-वेद पठाण, सुषमा भालेराव, वैशाली बर्गे, रामदास सोनवणे, तुषार अरगडे, श्रावणी खेमनर, संजय कानवडे, सादिक तांबोळी, महेश सानप आदी उपस्थित होते.

या निवेदनात म्हटले आहे की, संगमनेर शहर व परिसरात अनियमित वीजपुरवठा केल्याने अनेक समस्या निर्माण झाल्या आहे. अनियमित वीज पुरवठा, कमी किंवा जास्त होल्टेजची समस्या, तुटलेल्या तारा व अनेक रहदारीच्या ठिकाणी विजवाहक तारांना पडलेला झोळ, तसेच अनेक नागरिकांच्या घराजवळून गेलेल्या मेन लाईनच्या हाय व्होल्टेज लाईनच्या वीज वाहकतारांना संरक्षण कवच नसल्याने जीवित व मनुष्यहानी होण्याची शक्यता आहे. आदी तक्रारी करण्यात आल्या.

### वीजपुरवठा खंडित होणे चिंतेची बाब

मागील सहा महिन्यांपासून संगमनेर शहरासह ग्रामीण भागात विजेचा प्रश्न ऐरणीवर आहे. महावितरण या गोष्टीकडे प्राधान्याने लक्ष देणे गरजेचे आहे मात्र दुर्दैवाने तसे होत नाही. तालुक्यात सध्या असुरळीत वीज पुरवठा सुरू आहे. विच-ारणा केल्यास याबाबत उडवा उडवीची उत्तरे अधिकारी देत आहे. हे अत्यंत चुकीचे आहे. यावर तातडीने मार्ग काढावा अन्यथा तालुक्यातील जनता रस्त्यावर उतरून महावितरण कार्यालय विरोधात तीव्र निषेध आंदोलन करतील असा इशाराही दुर्गाताई तांबे यांनी दिला आहे.



# समस्यांचे निराकरण करण्यासाठी उपाययोजना करणार : डॉ. सुजय विखे पा.

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांची योग्य ती दखल घेतली जाईल. तसेच समस्यांचे निराकरण करण्यासाठी तातडीने उपाययोजना केल्या जातील, अशी ग्वाही खडकेवाके येथील जनता दरबारात डॉ. सुजय विखे पाटील यांनी नागरिकांना दिली.

राहाता तालुक्यातील खडकेवाके येथील फूड टेक्नॉलॉजी कॉलेज येथे डॉ. सुजय विखे पाटील यांचा जनता दरबार उत्साहात संपन्न झाला. या जनता दरबारासाठी अहिल्यानगर व परिसरातील विविध भागांतून मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

नागरिकांनी आपापल्या समस्या मांडत त्यावर तोडगा काढण्यात यावा, अशी मागणी केली. दरबाराच्या प्रारंभी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील साखर कारखान्याच्या चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल नागरिकांच्या वतीने डॉ. सुजय विखे पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी फुलांचा हार, शाल-श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी डॉ. सुजय विखे यांनी नागरिकांशी थेट संवाद साधला. नागरिकांच्या विविध अडचणी व प्रश्न गांभीर्याने ऐकून घेतले आणि नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांची योग्य ती दखल घेतली जाईल. तसेच समस्यांचे निराकरण करण्यासाठी तातडीने उपाययोजना केल्या जातील, अशी ग्वाही डॉ. विखे पाटील यांनी दिली. यावेळी मोठ्या प्रमाणात परिसरातील नागरिक उपस्थित होते.

> जनता दरबारात ग्रामीण भागातील पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य व शिक्षण अशा विविध क्षेत्रातील प्रश्नांवर भर देण्यात आला. नागरिकांच्या प्रश्नांसाठी प्रशासनाशी समन्वय साधून हे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपली भूमिका सकारात्मक राहणार आहे.
>
> **– डॉ. सुजय विखे पाटील**



# महावितरणविरोधात आंदोलनाचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : शहरात सुरू असलेल्या विजेच्या लपंडावाविरोधात सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने निवेदन देऊन त्वरित सुधारणा न झाल्यास टाळे ठोक आंदोलनाचा इशारा देण्यात आला. यावेळी कृती समितीचे अध्यक्ष प्रा. किसन चव्हाण, भाजप सरचिटणीस अरुण मुंढे, अ‍ॅड. थोरात, माजी उपनगराध्यक्ष वजीर पठाण, नगर-सेवक कमलेश गांधी, नगरसेवक दिगंबर काथवटे, नगरसेवक अजय भारस्कार, अ‍ॅड. कणगरे, नगर-सेवक अंकुश कुसळकर, वंचितचे तालुकाध्यक्ष प्यारेलाल शेख यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी शिष्टमंडळाने तालुका कार्यकारी अभियंता पुरोहित तसेच शहर अभियंता पगारे यांची भेट घेतली.

शहर व तालुक्यात सुरू असलेल्या विजेच्या लपंडावाबाबत धारेवर धरले. यावेळी वायरमन हे कायम उडवाउडवीची उत्तरे देतात. दिवसा व रात्री नेहमी वीज बंद असते. याबाबत त्वरित सुधारणा करावी, अन्यथा वीज वितरण कार्यालयाला टाळे ठोक आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला

# पावसामुळे ऊस, फळबागांना संजीवनी

## तालुक्यात ११७ मिलिमीटर पाऊस

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : पाण्याअभावी करपू लागलेला ऊस आणि फळबागांना पूर्व मोसमी पावसामुळे नवसंजीवनी मिळाली आहे. श्रीगोंदा तालुक्यातील अकरा महसूल मंडळांमध्ये गेल्या काही दिवसांत सरासरी ११७ मिलीमीटर पाऊस झाला असून सर्वाधिक पाऊस कोळगाव मंडळात तर सर्वात कमी लोणीव्यंकनाथ मंडळात झाला आहे.

खरिपाच्या तोंडावर पडलेला पाऊस दिलासा देणारा ठरत असला तरी काही ठिकाणी पावसामुळे कुकडीने टाळले अन् पूर्व मोसमी पावसाने तारले. आढळगाव परिसरात कुकडी लाभक्षेत्रात पाणीबाणी निर्माण झाली होती. गत आवर्तनात पाणी मिळाले नाही त्यामुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांस पूर्व मोसमी पाऊस तारणहार ठरला आहे.

कुकडीच्या गत आवर्तनात आढळगाव परिसरामध्ये वितरीका क्रमांक १२, १३ आणि १४ च्या लाभक्षेत्रातील शेतीला पाणी मिळाले नाही. या परिसरातील उन्हाळी पिके, फळबागा आणि ऊस पिके पाण्याअभावी जळून चालली होती. मोठ्या कष्टाने वाढविलेल्या फळबागा पाणी नसल्यामुळे काढून टाकण्याची वेळ आली होती. मे महिन्यात उन्हाचा तडाखा वाढत असतानाच गेल्या पाच दिवसांपासून पूर्व मोसमी पाऊसाने हजेरी लावल्यामुळे फळबागांना जीवदान मिळाले आहे. सुकलेल्या ऊस शेतीला पुन्हा पालवीची आशा निर्माण झाली आहे.



# ‘पायोनियर’ने घेतल्या शेतकऱ्यांसाठी कृषी कार्यशाळा

## बांधावर जाऊन केले शेतकऱ्यांना कृषीविषयक मार्गदर्शन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : पारनेर तालुक्यात खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी बाजरी बियाण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या पायोनियर कंपनीच्या वतीने कृषी कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे.

पारनेर तालुक्या तील वासुंदे, खडकवाडी, पिंपळगाव रोठा, नांदूर पठार, पाडळी तर्फे कान्हुर, किन्ही, रायतळे, दैठणे गुंजाळ, सारोळा आडवाई, गोरेगाव, वाळवणे, पिंपरी गवळी, पानोली, कान्हूर, पळशी, वनकुटे, ढवळपूरी, करंडी, चिंचोली, पुणेवाडी आणि पिंपळनेर या गावांमध्ये कृषी कार्यशाळा यशस्वीपणे पार पडल्या.

या उपक्रमांतर्गत पायोनियर कंपनीचे अधिकारी रणवीर देशमुख, प्रवीण चौधरी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन बाजरी आणि मक्याच्या पिकांच्या पेरणीबाबत तांत्रिक मार्गदर्शन करत आहेत. या कार्यशाळांमध्ये पायोनियर ८६, एम ९४ बाजरी आणि पी ३५२४ मका या उत्कृष्ट वाणांच्या बियाणाची व पिकांची माहिती देण्यात आली. हे वाण शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय ठरत असून, त्यांच्या उत्पादनक्षमतेमुळे शेतकऱ्यांची पसंती मिळवत आहेत.


कंपनीच्या तज्ज्ञांनी पेरणीची योग्य पद्धत, खत व्यवस्थापन, पाणी नियोजन आणि पीक संरक्षणाच्या उपाययोजनांबाबत सविस्तर माहिती दिली. शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेतात मार्गदर्शन मिळाल्याने त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे.या उपक्रमाचे तालुक्यातील प्रगतिशील शेतकऱ्यांनी स्वागत केले आहे. खडकवाडी येथील बबन गागरे, वनकुटे येथील सुरेश डुकरे, वासुंदे येथील भास्कर झावरे, मच्छिंद्र वाबळे, पाडळी तर्फे कान्हूर येथील योगेश दावभट आणि पिंपळगाव रोठा येथील दत्तात्रय घुले यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

वासुंदे येथील प्रगतशिल शेतकरी मच्छिंद्र वाबळे म्हणा-ले की, पायोनियर कंपनीचे अधिकारी आमच्या बांधावर येऊन पेरणीची योग्य पद्धत आणि उत्कृष्ट वाणांची माहिती देत आहेत. यामुळे आमच्या शेतीला नवी दिशा मिळेल. उत्पादन वाढीसाठी मदत होणार आहे.

> शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन मार्गदर्शन करण्याचा हा उपक्रम शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. पायोनियर कंपनीच्या या स्तुत्य प्रयत्नांमुळे तालुक्यातील शेतीला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा आहे. अशा उपक्रमांमुळे शेतकऱ्यांचे उत्पादन वाढण्यास आणि शेतीच्या आधुनिकीकरणास चालना मिळेल, असे शेतकऱ्यांचे मत आहे.



# बिबट्याने पाडला बोकडाचा फडशा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील खडी क्रेशर परिसरामध्ये बिबट्याने अनेक दिवसांपासून धुमाकूळ घालत श्री रावसाहेब पाटील कसार यांच्या शेतामध्ये दबा धरून शेळ्या चारत असताना खंडागळे यांच्या बोकडाला उचलून नेले.

खंडागळे यांनी घटनेची माहिती परिसरातील नागरिकांना दिली. यापूर्वीही बिबट्याने खंडागळे यांच्या दोन शेळ्या फस्त केल्या आहेत. परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झाले असून यापुर्वी शेळीचा संबंधीत विभागाकडून पंचनामा झाला. परंतु अद्याप नुकसान भरपाई मिळालेली नाही, तरी परीसरात गोपालक शेळी पालक या मध्ये भिती निर्माण झाली. काही दिवसांपुर्वी याच परिसरामध्ये बिबट्याचा वैद्यकिय उपचारा अभावी मृत्यू झाला होता.

या ठिकाणी मोठी लोकवस्ती असून संबंधित नरभक्षक बिबट्या लोकवस्तीत वावर करत असून शेतमजुर शेतात कामे करण्यासाठी येत नसल्याने शेतकरी वर्गांत असंतोष निर्माण झाला आहे. तरी संबधीत विभागाचे अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करून परीसरात पिंजरा लावण्याची मागणी रावसाहेब कसार संदिप कसार राजेन्द्र कसार आदि शेतकरी बांधव यांनी केली आहे.

## संपादकीय

# पाकला नाणेनिधीचा दणका

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकला धडा शिकवला आणि त्याचे दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. या धामधुमीतच आयएमएफ म्हणजे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकला एक अब्ज डॉलरचे कर्ज मंजूर केले होते. पण त्या कर्जाच्या कागदाची शाई वाळण्याआधीच नाणेनिधीने पाकला नव्या अटी लादल्या असून त्यामुळे पाकचा बेल आऊट कार्यक्रम धोक्यात आला आहे. भारतासाठी ही सुखद बातमी आहे. भारताबरोबरच्या तणावामुळे योजनेच्या वित्तीय, बाह्य आणि सुधारणा कार्यक्रमाला धोका होऊ शकतो. १७.६ ट्रिलियन रुपयांच्या नवीन अर्थसंकल्पाला संसदेची मान्यता आणि अन्य जाचक अटी पाकवर लादल्या आहेत. नाणेनिधीचे पाक प्रेम कुविख्यात आहे. पण यंदा मात्र नाणेनिधीकडून पाकला मदत मिळणार नाही आणि मिळाली तरी ती जाचक अटींमुळे असेल असा यात स्वागतार्ह बदल झाला आहे. अर्थात आयएमएफकडून पाकला मदत मिळूनही आतापर्यंत पाकची अर्थव्यवस्था सावरण्यास आणि पाकच्या अर्थव्यवस्थेला चांगले दिवस दाखवण्यास पाक अपयशी ठरला आहे. पाकच्या आर्थिक समस्या काय आहेत आणि यातून तो कसा मार्ग काढतो यावर आम्हाला रस असण्याचे काहीही कारण नाही. पण पाक आर्थिक संकटात आहे आणि हे बेल आऊट पॅकेज मिळूनही तो आपल्या आर्थिक संकटातून येत नाही हे भारतासाठी मोलाचे आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून वर्षानुवर्षे कर्ज मिळूनही पाक त्याचा उपयोग दहशतवाद्याना पोसण्यात करत आला आहे. अगदी १९४७ पासून पाक अस्तित्वात आल्यापासूनच पाकचे हे धोरण राहिले आहे आणि त्यामुळे त्याला कर्ज देण्यास भारताचा कायम विरोध राहिला आहे. कारण या कर्जाचा उपयोग अर्थात भारताच्या विरोधातच पाक करत आला आहे म्हणूनच इतकी गंगा आली तरी पाक कोरडा तो कोरडाच राहिला आहे. वारंवार कर्ज दिल्यानंतरही पाकच्या आर्थिक स्थितीत सुधारणा का होत नाही असा सवाल भारताने अनेक वेळा उपस्थित केला आहे. पण याला उत्तर आहे की पाक तो सारा पैसा दहशतवाद्यांचे नेटवर्क आणि टेरर फंडिंगसाठी करतो. त्या पैशांचा विनियोग देशांतर्गत अर्थव्यवस्था सुधारण्याकडे होतच नाही. त्यामुळे पाकची ही अवस्था आहे.

पाकवर आता नाणेनिधीने नव्या अटी लादल्या असल्याने पाकचे श्वास घेणे मुश्कील झाले आहे. नाणेनिधीला पाकचे प्रेम खूपच आहे, पण पाकला तीही संघटना वर काढू शकत नाही. नाणेनिधीचा पाकला मदत करण्याचा निर्णय अत्यंत धोकादायक आहे आणि जागतिक मूल्यांच्या सुरक्षेसाठी अतिशय चुकीचा आहे असा इशारा देण्यात आला आहे. पाकिस्तान ३५ वर्षांपासून आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून मदतीचा लाभ घेत आला आहे, पण तिचा उपयोग भारताविरोधात केला आहे आणि तरीही पाकला मदत करण्याचे नाणेनिधीचे धोरण चालूच राहिले आहे. वास्तविक नाणेनिधी किंवा संयुक्त राष्ट्रसंघ या संघटना या भारतविरोधी आहेत आणि त्यांचा दृष्टिकोन हा नेहमीच भारतविरोधी विशेषतः विकसनशील देशविरोधी राहिला आहे, हे आतापर्यंत अनेक वर्षे भारत सातत्याने सांगत आला आहे. पण या संघटनांच्या भूमिकेत बदल होत नाही. इतक्या त्या पाश्चात्य राष्ट्रांच्या अधीन झाल्या आहेत. पण आता मात्र पाकला चांगलाच धडा शिकवण्याचा निर्धार नाणेनिधीने केला आहे आणि पाकवर ज्या नव्या अटी लादल्या आहेत त्यामुळे पाकचे कंबरडे पुरते मोडून पडणार आहे. या संघटना कितीही पाक प्रेमी असल्या तरीही त्यांना पाक या आपल्या लाडक्या अपत्याला आता दूर करावेच लागणार आहे अन्यथा या संघटनाच कालबाह्य ठरण्याचा धोका आहे. पहलगाम हल्ल्यानंतर आणि भारताचे सैनिक पाकला धडा शिकवत असतानाही नाणेनिधीने पाकला १.४ अब्ज डॉलरची मदत करण्याचा निर्णय घेतला होता आणि तोही ऐन युद्ध भरात असताना. पण आता नाणेनिधीला उपरती झाली आहे आणि त्याने पाकला नव्या अटी लादल्या आहेत. अर्थात नाणेनिधीला उपरती झाली म्हणून लगेच आपण त्याचे कौतुक करायला नको. कारण पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकला जबरदस्त उत्तर दिले असतानाही आणि पाकचे एअरबेस उद्ध्वस्त केले असतानाही आयएमएफने पाकला १२ हजार कोटी रुपयांचे कर्ज मंजूर केले.

ज्या दिवशी पाकला हे कर्ज मंजूर केले त्याच दिवशी पाकने केलेले देशविघातक कृत्याचा पंचनामा भारताने आंतरराष्ट्रीय समुदायासमोर मांडला होता. नाणेनिधी दुटप्पी आहेच हे त्यातून सिद्ध होत आहे. पण त्याचबरोबर या नव्या अटीमुळे पाकला आणखी एक दणका मिळाला आहे आणि त्यातून तो बाहेर पडू शकणार नाही याची व्यवस्था करण्यात आली आहे. पाकला १९५८ पासून बेल आऊट पॅकेज मिळण्यास सुरुवात झाली. तेव्हापासून पाकला ४४ अब्ज डॉलरचे पॅकेज मिळाले आहे. त्याचा उपयोग पाकने दहशतवाद्यांना पोसण्यात आणि भारताविरोधात कट कारस्थाने करण्यात केला आहे. त्यामुळे पाकला इतकी मदत करणारा नाणेनिधी हाही भारतविरोधीच आहे. आता पाकने ज्या नव्या अटी लादल्या आहेत त्यातून पाक सावरणे अवघड आहे, कारण त्या अटींमध्ये पाकची अर्थव्यवस्था सुधारण्याचा समावेश आहे, पण उनाड मुलाला जशी अभ्यासाची अट नको वाटते तसेच पाकचे आहे. त्याला केवळ दहशतवाद्यांना पोसणे आणि इतर देशांविरोधात कारवाया करण्यासाठी त्यांना उचकवणे यातच रस आहे. त्यामुळे पाकला निधी देण्याचा निर्णय मुळात चुकीच्या वेळी घेतला आहे. त्याविरुद्ध जोरदार मत प्रदर्शन करण्यात आले आहे. ऑपरेशन सिंदूरपासून आयएमएफने अनेक अटी पाकवर लादल्या आहेत त्यामुळे पाक जरा-जर्जर झाला आहे. पण पाकवर आयएमएफने संरक्षण खर्चावर नियंत्रण आणि दहशतवादाला मदत न करणे या अटींचा समावेश नाही. नेमक्या याचाच फायदा आतापर्यंत पाक घेत आला आहे. पण आता तसे तो करू शकणार नाही. आयएमएफनेही आता पाकचे दहशतवादाबद्दल वाटणारे प्रेम लक्षात घेऊन त्या देशाला धडा शिकवला पाहिजे. पाकवर अटी लादतानाच आयएमएफनेही आपण कालबाह्य ठरण्याचा धोका आहे हे लक्षात ठेवले पाहिजे.

# उत्तम दरासाठी प्रक्रिया उद्योगावर हवा भर

**विशेष**

**प्रा. सुखदेव बखळे**

एकीकडे शेतकऱ्यांच्या शेतीमालाला पुरेसा भाव मिळत नाही, तर दुसरीकडे अन्न प्रक्रियेअभावी ३० टक्के फळे, भाज्या वाया जातात. अन्न वाया न घालवल्यास शेतकऱ्यांना कष्टाचे पूर्ण फळ मिळेल आणि उत्पन्न वाढेल. सर्वांसाठी जास्त अन्न शिल्लक राहील, कोणीही उपाशी राहणार नाही. शेतीतले नुकसानही कमी होईल. त्यासाठी अन्न प्रक्रियेच्या मुद्दयाकडे गांभिर्याने पहावे लागेल.

जगभरात शेतांपासून दुकानांपर्यंत १३.२ टक्के अन्न वाया जाते. १७ टक्के अन्न दुकाने आणि घरांमधून फेकून दिले जाते. एकूणच, सुमारे ३० टक्के अन्न कधीच कोणाच्याही पोटात पोहोचत नाही. गरीब देशांमध्ये शेतातून गोदामे आणि दुकानांपर्यंत अन्न येताना वाया जाते. श्रीमंत देशांमधील बहुतेक अन्न घरांमध्ये वाया जाते, म्हणजेच लोक गरजेपेक्षा जास्त खरेदी करतात आणि उरलेले अन्न फेकून देतात. भारतात अन्न वाया जाण्याबाबत कोणताही मोठे सरकारी सर्वेक्षण झालेले नाही; परंतु कापणीनंतर बनणारे किती अन्न वाया जाते हे शोधण्यासाठी काही सर्वेक्षणे करण्यात आली आहेत. 'आयसीएआर-सीआयपीएचईटी' ने २०१२ आणि २०१५ मध्ये सर्वेक्षण केले. 'नॅबकॉन्स' या संस्थेने २०२२ मध्ये सर्वेक्षण केले. त्याचे सर्वेक्षण अहवाल पाहिल्यास भारतात धान्य उत्पादनात खूप वाढ झाली आहे, हे लक्षात येते. १९६६-६७ मध्ये आपण ७४ दशलक्ष टन धान्याचे उत्पादन करायचो. ते २०२२-२३ मध्ये वाढून ३३० दशलक्ष टन झाले. आपण तांदळाचे मोठे निर्यातदारही आहोत. फळे आणि भाज्यांचे उत्पादनही वाढले आहे; पण उत्पादन वाढत असताना, तोटाही वाढत आहे. येथे यंत्रांचा वापर कमी आहे आणि गोदामातून दुकानांपर्यंत माल पोहोचवण्याची व्यवस्थाही कमकुवत आहे. या सर्वेक्षणातून दिसून आले आहे की, कापणीनंतरचे नुकसान थोडे कमी झाले आहे; परंतु तरीही अजून ते खूप जास्त आहे. 'नॅबकॉन्स' च्या २०२२ च्या सर्वेक्षणानुसार २०२० ते २०२२ दरम्यान पिकांचे आणि शेतीशी संबंधित गोष्टींचे नुकसान झाल्यामुळे आपल्याला दर वर्षी १.५३ लाख कोटी रुपयांचे (१८.५ अब्ज डॉलर्स) नुकसान सहन करावे लागले आहे. भारतात धान्य, डाळी आणि तेलबियांचे नुकसान जागतिक पातळीपेक्षा जास्त आहे. याचे मुख्य कारण म्हणजे शेतीमध्ये यंत्रसामग्रीचा कमी वापर आणि साठवणूक आणि वाहतुकीच्या कमी सुविधा हे आहे. यामुळे या विषयाचा साकल्याने वेध घेणे आवश्यक आहे.

चीनमध्ये धान्याचे नुकसान फक्त २.२२ टक्के आहे. भारतात ते ४.४४ टक्के आहे. फळे आणि भाज्यांचे नुकसान तृणधान्ये आणि तेलबियांपेक्षा जास्त आहे; परंतु जागतिक सरासरीच्या तुलनेत भारतात हे नुकसान कमी आहे. गुणवत्तेचा ऱ्हास हीदेखील एक मोठी समस्या आहे. आपल्या देशात धान्य, डाळी आणि तेल उत्पादनांचे नुकसान खूप मोठे आहे. फळे आणि भाज्यांचे नुकसान थोडे कमी आहे. सर्वेक्षण फक्त नुकसानाचे प्रमाण सांगते; परंतु गुणवत्तेत किती नुकसान झाले हे यावरून कळत नाही. उदाहरणार्थ पीक कापले जाते, स्वच्छ केले जाते, घरी किंवा बाजारात नेले जाते आणि नंतर गोदामे आणि दुकानांमध्ये पोहोचवले जाते, तेव्हा गुणवत्तेतही खूप नुकसान होते. 'आयसीएआर' या संस्थेतर्फे धान्याच्या प्रमाणासोबत गुणवत्तेतील तोटा मोजण्याचा प्रयत्न केला. पंजाब, मध्य प्रदेश आणि बिहारमधील काही जिल्ह्यांमध्ये भात, गहू, मका आणि सोयाबीनवर हे सर्वेक्षण करण्यात आले. १२०० शेतकरी आणि ११६ बाजारपेठेतील लोकांकडून माहिती गोळा करण्यात आली. सर्वेक्षणात



सोयाबीनचे सर्वाधिक १५.३४ टक्के नुकसान झाल्याचे दिसून आले. गव्हाचे ७.८७ टक्के नुकसान झाले. धानाचे ६.३७ टक्के नुकसान झाले. मक्याचे ५.९५ टक्के नुकसान झाले. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे गव्हाच्या गुणवत्तेचे नुकसान २.२७ टक्के इतके होते. याचे कारण गव्हामध्ये ओलावा शोषून घेण्याची क्षमता असते. त्यामुळे गोदामात साठवल्यावर त्याची गुणवत्ता खराब होते. गुणवत्तेत घट होणे दर्शवते की पिकाची गुणवत्ता किती खालावली आहे.

शेतकऱ्यांच्या पातळीवर कापणीनंतरच्या नुकसानाची कारणे शोधण्यासाठी 'आयसीआरआयईआर' ने भात पिकाची निवड केली आणि तीन राज्यांमधील ६०० भात उत्पादक शेतकऱ्यांचे सर्वेक्षण केले. त्यात आढळून आले की शेत जितके मोठे असेल तितके नुकसान कमी होते. कंबाईन हार्वेस्टर वापरल्याने नुकसान कमी होते. कुटुंबप्रमुखाचे शिक्षण जितके जास्त असेल तितके नुकसान कमी होते. बाजारापासून जितके जास्त अंतर असेल तितके नुकसान जास्त. सर्वात मोठी बाब म्हणजे लहान शेतांमध्ये जास्त नुकसान होते. शेतीचा आकार एका युनिटने वाढल्यास भाताचे नुकसान प्रति हेक्टर सात टक्क्यांनी कमी होते. भारतातील ८६ टक्के शेतकऱ्यांकडे दोन हेक्टरपेक्षा कमी जमीन आहे. त्यामुळे त्यांना जास्त नुकसान सहन करावे लागते. बिहारमध्ये लहान शेतांची संख्या सर्वाधिक आहे. त्यामुळे तेथे प्रति हेक्टर नुकसानही जास्त आहे. येथे लहान शेतकऱ्यांचे प्रति हेक्टर ३.५ किलो नुकसान होते, तर मोठ्या शेतकऱ्यांचे सुमारे १.१६ किलो नुकसान होते. दुसरे प्रमुख कारण म्हणजे शेतकऱ्यांकडे यंत्रांची कमतरता आहे. विशेषतः कंबाईन हार्वेस्टरची कमतरता आहे. कंबाईन हार्वेस्टर वापरल्याने नुकसान कमी होते. भारतात कापणीनंतर मोठ्या प्रमाणात धान्य वाया जाते. याला साठवणुकीचा अभाव, पारंपारिक धान्य व्यवस्थापन प्रणाली कारणीभूत आहे.

या समस्येवर अन्न प्रक्रिया हा एक प्रभावी उपाय ठरू शकतो. अन्न प्रक्रियेमुळे दीर्घकालीन साठवणुकीची गरज कमी होते. प्रक्रिया केलेले धान्य जास्त काळ टिकते, कारण ते खराब होण्याची शक्यता कमी असते. उदा. गव्हाचे पीठ, रवा, ब्रेड, बिस्किटे आणि शिजवण्यासाठी तयार पदार्थांमध्ये रूपांतर केल्याने त्याचे शेल्फ लाइफ वाढते. शेतकऱ्यांनी आपले उत्पादन थेट अन्न प्रक्रिया युनिट्सना विकल्यास चांगला भाव मिळू शकतो. यामुळे शेतकऱ्यांना त्यांचे धान्य खराब होण्याच्या भीतीने कमी किमतीत घाईघाईने विकण्याची गरज भासणार नाही. उदाहरणार्थ भातावर प्रक्रिया करून तांदूळ, पोहे, फुगीर तांदूळ बनवल्याने किंमत आणि मागणी वाढते. धान्य जास्त काळ सुरक्षित राहिले आणि कमी वाया गेले तर भारत अन्न सुरक्षेच्या बाबतीत अधिक मजबूत होईल. अन्न प्रक्रिया निर्यातीच्या संधीदेखील वाढवू शकते. त्यामुळे शेतकरी आणि उद्योगांना फायदा होईल. अशा प्रकारे, अन्न प्रक्रिया केवळ धान्याची नासाडी रोखण्यास मदत करू शकत नाही, तर शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यास, अन्न सुरक्षा मजबूत करण्यास आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला पुढे नेण्यासदेखील मदत करू शकते. भारत हा कृषीप्रधान देश आहे. या देशातील अर्ध्याहून अधिक लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. त्याचे भौगोलिक स्थान आणि नैसर्गिक संसाधने हे दूध, मांस, फळे, भाज्या आणि धान्ये यासारख्या अनेक अन्नपदार्थांचे प्रमुख उत्पादक बनवतात; परंतु या उत्पादनांच्या प्रक्रियेची पातळी खूपच कमी आहे.

सरकारच्या अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाने २०२१ मध्ये डेलॉइट नावाच्या कंपनीच्या मदतीने एक सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणातून दिसून आले की फळांच्या प्रक्रियेचे प्रमाण खूपच कमी म्हणजे ४.५ टक्के आहे. भाज्यांची परिस्थिती आणखी वाईट आहे. फक्त २.७ टक्के भाज्यांवर प्रक्रिया केली जाते. दूध प्रक्रियेचा स्तर (२१.१ टक्के) थोडा चांगला आहे. मांस प्रक्रियेची पातळी सर्वाधिक (३४.२ टक्के) आहे. माशांच्या प्रक्रियेची पातळी १५.४ टक्के आहे. अन्न प्रक्रिया क्षेत्राची वाढ केवळ अन्नपदार्थांपुरती मर्यादित नाही, तर शेतकऱ्यांचे उत्पन्न, रोजगाराच्या संधी आणि निर्यात बाजारपेठ यांना नवीन उंचीवर घेऊन जाते. अन्न प्रक्रिया वाढते, तेव्हा कच्च्या मालाची मागणीही वाढते. याचा अर्थ शेतकऱ्यांच्या पिकांना चांगला भाव मिळतो. प्रक्रिया क्षेत्राच्या वाढीसह शेती केवळ उपजीविकेचे साधन बनत नाही, तर एक मोठा व्यवसायदेखील बनू शकते. भारतात अन्न आणि पेयांचा व्यवसाय सुमारे ३८० अब्ज डॉलरचा आहे आणि यापैकी ३२ टक्के अन्न प्रक्रिया क्षेत्रातून येते. २०१४ पासून हा व्यवसाय दर वर्षी आठ टक्के दराने वाढत आहे; पण याबाबत जाणवणारी एक मोठी समस्या म्हणजे अन्नपदार्थांची नासाडी. आपल्या देशात फळे आणि भाज्यांसारख्या सुमारे ४० टक्के नाशवंत वस्तू वाया जातात. 'सीआयपीएचईटी' या सरकारी संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात आढळून आले की, आपल्याकडे सुमारे ४.६५ टक्के ते ५.९९ टक्के धान्य वाया जाते. फळे आणि भाज्यांमध्ये सुमारे ४.५८ टक्के ते १५.८८ टक्क्यांपर्यंत नासाडी होते. २०१० मध्ये डाळींची नासाडी ४.३ टक्क्यांवरून ६.१ टक्क्यांपर्यंत वाढली; २०१५ मध्ये ती ६.३६ टक्क्यांवरून ८.४१ टक्क्यांपर्यंत वाढली. या सर्वेक्षणात असेही दिसून आले आहे की पीक काढणीनंतर होणारे नुकसान ९२,६५१ कोटी रुपयांचे आहे. यामुळे शेतीमध्ये पायाभूत गुंतवणूक आणि अन्न प्रक्रिया उद्योगावर भर देणे किती आवश्यक आहे, हे लक्षात येईल.

# न्यू इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी २५ वर्षांनी आले एकत्र

## जुन्या वर्गमित्रांची पुन्हा भरली शाळा; माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सुपा** : २५ वर्षांनी एकत्र आलेल्या वर्गमित्रांची शाळा भरली, शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. आयोजित स्नेहमेळाव्यानिमित्त सर्वांनी मिळून शाळेला मदत करण्याचा निर्धार दिला. पारनेर तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल सुपा शाळेतील १९९९-२००० मधील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा पार पडला.

अध्यक्षस्थानी शिवाजी पानमंद होते. प्रास्ताविकात प्रा. सचिन मगर यांनी शाळेतील आठवणींसह कार्यक्रमाची रूपरेषा मांडली, प्राचार्य मंगेश जाधव,दादाभाऊ गट, तुकाराम ढोले, मार्तंडराव बुचुडे, तुकाराम रासकर, गंगाधर गाडीलकर, साहेबराव ठोकळ, उत्तम ठोकळ, विष्णू भोसले, नकुल शिर्के, गाजरे, बबन निवडुंगे, छगन कातोरे, काकडे आदी शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व शिक्षकांवर विद्यार्थ्यांनी पुष्पवृष्टी करून तत्कालीन वर्गशिक्षक डी. व्ही. गट यांनी सर्व विद्यार्थ्यांची वर्गात बसून हजेरी घेतली. आजी-माजी सैनिक असणाऱ्या विद्यार्थ्यांचाही सन्मान करण्यात आला. दरम्यानच्या काळात दिवंगत झालेल्या शिक्षक व विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. अनेकांनी शाळेसह जीवनातील अनुभव ते आजपर्यंतचा जीवन प्रवास शब्दात उलगडला.

### यांनी जागविल्या आठवणी

पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. नितीन मगर यांनी पुन्हा एकदा बालपण अनुभवायला मिळाल्याबद्दल सर्वांना धन्यवाद दिले. ज्ञानेश्वर इंगळे, विजय जरे, विक्रम गाडीलकर, स्वाती दातीर, महेश चेडे, अनिल गवळी यांनी शालेय जीवनातील संघर्ष गाथा सर्वांसमोर मांडली.



यावेळी सर्वश्री गट, बुचडे, शिर्के,पानमंद, जाधव, काकडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. क्रिकेट, संगीत खुर्ची, आगगाडी, खजिना शोध, कोण विजेता होणार या रेश्मा चोरबेले, रोहिणी रासकर, समीर शेख यांनी आयोजित विविध मनोरंजक खेळात विद्यार्थी सहभागी झाले. नियोजन पारनेर पंचायत समितीचे माजी सभापती दीपक पवार, आदर्श शिक्षक ज्ञानेश्वर इंगळे यांनी केले.

त्यांना रेश्मा चोरबेले, समीर शेख, प्रशांत बाफना, शहाजी नांगरे, बाळासाहेब नेटके, गणेश सोनवणे, अशोक गवळी, सचिन मगर, प्रवीण सुपेकर, प्रवीण गवळी, नंदकुमार दिवटे, अभय पवार, सतीश पवार, रोहिणी रासकर, ज्योती शिर्के, हर्षदा पवार, सारिका मगर, संगीता गवळी, मंगल पवार यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन रेश्मा चोरबेले व ज्ञानेश्वर इंगळे यांनी केले.

# जलसंधारण कार्यालयाने केले यश संपादन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : शेवगाव व पाथर्डी या तीन तालुक्यांचा समावेश असलेल्या या नव्याने स्थापन झालेल्या उपविभागाने केवळ शंभर दिवसांत कार्यालयीन व्यवस्थापन, सेवा सुविधा आणि माहिती फलकांचे अद्ययावतीकरण करत नाशिक विभागात पहिला क्रमांक पटकावला आहे जलयुक्त शिवार२ ० योजनेचा सदस्य सचिव म्हणून कार्यरत असलेल्या या विभागाचे प्रवीण दहातोंडे या अधिकाऱ्यांनी नेवासा (१२ गावे), शेवगाव (१७ गावे) आणि पाथर्डी (१८ गावे) येथील पाण्याचे ताळेबंद तयार करून गाव आराखडे वर यशस्वीरित्या अपलोड केले. गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेत प्रगती करताना तिन्ही तालुक्यांतील मागणी प्राप्त सर्व कामांची अंदाजपत्रके तयार करण्यात आली असून सन



२०२४-२५ मध्ये स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने १० कामे पूर्ण झाली आहेत.जैनपूर, घोगरगाव व बेलपांढरी येथील कापरी ओढ्यांचे रुंदीकरण व खोलीकरण करण्यात आले. परिणामी ३०० एकर क्षारपड जमीन लागवडीयोग्य झाली. हे काम जलसंपदा विभागाच्या यांत्रिकी शाखेच्या माध्यमातून पार पडले.

मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना अंतर्गत विविध कामे यशस्वीरित्या पूर्ण झाली आहेत. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेची प्रभावी अंमलबजावणी पाथर्डी तालुक्यातील करंजी, दगडवाडी, घाटशिरस व सातवड या गावांमध्ये करण्यात आली.

उपविभागाच्या यशस्वी वाटचालीला प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, नाशिक श्री. हरिभाऊ गिते तसेच जिल्हा जलसंधारण अधिकारी, अहिल्यानगर श्री. पांडुरंग गायसमुद्रे यांनी उपविभागाच्या कार्याचे कौतुक करत अभिनंदन व्यक्त केले. उपविभागीय जलसंधारण अधिकारी श्री. प्रविण दहातोंडे यांनी या यशाचे श्रेय वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन व सर्व कर्मचाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांना दिले. त्यांनी असेही स्पष्ट केले की, "हे एकट्याचे नसून संपूर्ण टीमच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे फलित आहे. भविष्यातही अशीच गुणवत्ता आणि नाविन्यपूर्ण कार्यपद्धती जपली जाईल."

# तिसगावच्या उपनगरातील रस्त्यांची दुरावस्था ?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी** : पाथर्डी तालुक्यातील एक मोठी व्यापारी बाजारपेठ म्हणून ओळख असलेल्या तिसगाव येथील उपनगरातील रस्त्यांची मोठी दुरावस्था झाली असून रस्त्यावर चिखल पाणी साचत असल्यामुळे नागरिकांना चिखल तुडवत ये-जा करावी लागत आहे.

पाणीटंचाई बरोबरच तिसगाव ग्रामस्थांना आता अवकाळी पावसामुळे रस्त्याच्या झालेल्या दुरावस्थेचा सामना करावा



लागत आहे. तिसगाव येथील माधवनगर, कोट परिसर, तुळजापूर परिसर या भागामध्ये मोठ्या प्रमाणात रस्त्यांची दुरावस्था झालेली आहे.

बारा महिन्यात बारा वेळा देखील नळाला पाणी येत नाही. रस्ते नीटनेटके नाहीत त्यामुळे मूलभूत सुविधा अभावी तिसगावच्या ग्रामस्थांमधून तीव्र नाराजगी व्यक्त केली जात आहे. ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी तिसगावमधील सर्वच प्रभागांमध्ये फेरफटका मारून रस्त्यांची झालेली दुरावस्था नजरेखालून घालावी व मुरूम टाकून तात्पुरती तरी रस्ता दुरुस्ती करावी, अशी मागणी तिसगावकरांकडून करण्यात येत आहे. तिसगाव येथील माधवनगर येथील रस्ता वादात अडकल्यामुळे त्या ठिकाणी रस्त्यावर मुरूम टाकण्यास अडथळा येत आहे. मात्र इतर प्रभागात सदस्य व ग्रामस्थांच्या मागणीनुसार निश्चितपणे मुरूम टाकून रस्त्यांची दुरुस्ती केली जाईल. कोणाचीही गैरसोय होणार नाही, याची ग्रामपंचायत निश्चितपणे काळजी घेत आहे, असे सरपंच मुनिफा शेख यांनी सांगितले.

# 'ढाकणे'मध्ये प्रवेशासाठी सुविधा केंद्र सुरू : ढाकणे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : तालुक्यातील राक्षी येथील ढाकणे कॉलेज ऑफ इंजीनियरिंगमध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी सन २०२५-२६ करिता डिप्लोमा इंजीनियरिंग अर्थात पॉलिटेक्निक कॉलेजची प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली आहे. ढाकणे पॉलिटेक्निक कॉलेजला तंत्र शिक्षण संचालनालय या कार्यालयाकडून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता सुविधा केंद्र म्हणून मान्यता मिळालेली आहे यंदा प्रथम वर्ष पॉलिटेक्निक प्रवेशासाठी २० मे ते १६ जूनपर्यंत ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे.

यावेळेस सुविधा केंद्रात ओरिजनल कागदपत्रांची पडताळणी करून विद्यार्थ्यांचे अर्ज कन्फर्म केले जातील. त्यानंतर मेरिट फायनल होऊन विद्यार्थी अभ्यासक्रमांसाठी विकल्प सादर करू शकतील. पॉलिटेक्निक इंजीनियरिंग हा शिक्षणाचा उच्च दर्जाच्या शिक्षणामधील तंत्रशिक्षणामधील महत्त्वपूर्ण पाया असून




तीन वर्षांचा अभ्यासक्रम दहावी पास नंतर पूर्ण केल्यानंतर तात्काळ नोकरीच्या संधी प्राप्त होतात त्याच बरोबर पुढे डायरेक्ट सेकंड इयर डिग्री इंजीनियरिंग साठी प्रवेश दिला जातो.

इच्छुक विद्यार्थी पालक यांनी राक्षी या ठिकाणी संपर्क करून आपले प्रवेश ऑनलाईन माहिती भरण्यासाठी संपर्क करावा, असे आवाहन इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. एच. अत्तार, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत ढाकणे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, ✻ कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11

# आश्वी परीसरातील गावे १६ तास अंधारात

## महावितरण कंपनीचा अजब कारभार; ग्रामस्थांमध्ये संताप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी** : आश्वी खुर्द सबस्टेशन मधील रिले नादुरूस्त झाल्यामुळे आश्वी बुद्रुक, आश्वी खुर्द, उंबरी बाळापूर, दाढ खुर्द, शिबलापुर, हंगेवाडी, खळी, पिंप्रीलौकी अजमपूरसह जवळपास १५ हून अधिक गावांचा विजपुरवठा आश्वी खंडीत होता. यामुळे परीसरातील सरकारी तसेच खाजगी व सरकारी बँक, सरकारी कार्यालय तसेच वीज पुरवठ्यावर अवलंबून असणाऱ्या लहान मोठे व्यावसाईकांना वीज पुरवठा बंद असल्यामुळे मोठा फटका बसला.



दि. २१ रोजी मध्यरात्री सुरू झालेल्या पावसामुळे दि. २२ मे रोजी पहाटे २ वाजता विद्यात पुरवठा बंद झाला तो परत सुरूच झाला नाही. विजवितरण कंपनीच्या हालगर्जीपणामुळे नेहमीच पावसाळ्याच्या काळात या गावाची विज पुरवठ्याचा लपण डाव सुरू असतो. नेहमीच पावसाळा सुरू झाला की, येथील कर्मचाऱ्यांना विद्यात तारेला लागणाऱ्या फांद्या तोडण्याचे आठवण येते. गेल्या वर्षीही पावसाळ्यामध्ये आश्वी बुद्रुक लोणी रोड वरील ताजणे मळा रस्तायवरील झाडांची फांदी विद्युत पुरवठा होत असणाऱ्यां तारावर पडल्यामुळे २४ तासाहुन अधिक काळ विज पुरवठा खंडित होता.१५ ते १६ तासाहून अधिक काळ विज पुरवठा खंडित होता यामुळे आईस्क्रिम पार्लर तसेच परीसरातील शुध्द पाणी विक्रेतांना मोठा आर्थिक तोटा बसला आहे. नेहमीच विज वितरण कंपनीला पावसाळा सुरू झाला की झाडे तोडण्याची आठवण येत असते. १५ ते १६ तास जर विद्यात पुरवठा बंद राहिले तर आईस्क्रिम हे वितळल्याने मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे आईस्क्रीम विक्रेते संजय गायकवाड यांनी सांगितले.

आश्वी खुर्द सबस्टेशन मधील ट्रन्सफॉमरचा रिले नादुरूस्त झाला होता. काम करताना ट्रन्सफॉमरचे आईल लेव्हल कमी झाली. त्यामुळे दि. २२ मे रीजी दुपारी २ वाजता आईल आले. सदर ऑईल डायरेक्ट कंपनी मधुन आल्याने त्यांची गुणवंत्ता चाचणीसाठी त्याचे नमुने हे संगमनेर येथे पाठवण्यात आला. ऑईलचा तांत्रिक बाबीचा आव्हाल आल्या नंतरच ऑईल हे ट्रान्सफॉर्मर मध्ये टाकण्यात येईल.त्यानंतर विद्या पुरवठा सुरळीत होणार असल्याचे आश्वी खुर्द (ता. संगमनेर) येथील वीज वितरण सबस्टेशनमधील वरिष्ठ तंत्रज्ञ हेमंत सुर्यवंशी यांनी सांगितले.

# वडाळा महादेव येथे शनिमहात्म्य ग्रंथ पारायण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वडाळा महादेव :** श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील महादेव मंदिर परिसरातील शनी मंदिर या ठिकाणी शनैश्वर जयंतीनिमित्त श्री शनि महात्म्य ग्रंथ सामुदायिक पारायण सोहळा तसेच भगवद्गीता पारायण अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन दिनांक १९ ते २६ मे पर्यंत करण्यात आले आहे.

ब्रह्मलीन महंत नारायणगिरीजी महाराज, परम पूज्य गुरुदेव डॉ. काटे स्वामीजी, बालब्रह्मचारी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने महंत गुरुवर्य रामगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच हभप पुरुषोत्तम महाराज कोळपकर यांच्या अधिपत्याखाली पहाटे काकडा आरती, हनुमान चालीसा पठण, रामरक्षा स्तोत्र, दुपारी तीन ते सहा भजन व हरिपाठ अशा विविध कार्यक्रमांचे या सप्ताह कालावधीमध्ये आयोजन करण्यात आले आहे. दिनांक २५ रोजी सायंकाळी पाच वाजता दीपोत्सव व ग्रंथ मिरवणूक संपन्न होणार आहे. तसेच दिनांक २६ रोजी सकाळी मान्यवरांच्या हस्ते जलाभिषेक आरती तसेच हभप माधुरीताई वायकर महाराज यांचे सुश्राव्य कीर्तन होईल तसेच यानंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे.



या कार्यक्रमासाठी विठ्ठल वायकर, रामकृष्ण भोंडगे, चंदन पारखे, चंद्रकला डोळस, निर्मलाताई गोराणे, सखाराम दिवटे, बाबासाहेब मुठे, शामराव नवले, बापूसाहेब तागड, नानासाहेब गायकवाड, आत्माराम गायकवाड तसेच समस्त ग्रामस्थ या कार्यक्रमासाठी प्रयत्नशील आहेत.

# युपीएससीत उत्तीर्ण झालेल्या अभिजीत आहेर यांचा सन्मान

**जनता आवाज वृत्तसेवा**



**पारनेर** : केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत भारतीय वनसेवा , भारतीय महसुल सेवा, भारतीय गुप्तचर विभाग या ३ केंद्रीय पातळीवरील उच्च पदांवर यश प्राप्त केलेले पारनेर तालुक्यातील पळसपूर येथील सुपुत्र व नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळाच्या निघोज येथील श्री मुलिकादेवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सहदेव आहेर यांचे चिरंजीव अभिजित सहदेव आहेर यांचा पळसपूर ग्रामस्थांच्यवतीने भव्य नागरी सन्मान सोमवार दि.२६ रोजी सायंकाळी ६ वाजता करण्यात येणार आहे.

अभिजित आहेर यांची प्रथम दुपारी ४ वाजता वाद्यांच्या गजरात, फटाक्यांच्या आतिषबाजीत भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. केंद्रीय पातळीवरील युपीएससी परीक्षेत ३ पदांवर यश मिळवणारे अभिजित आहेर हे पहिलेच उदाहरण आहे. पारनेर तालुक्यात विविध ठिकाणी त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला आहे. परंतू ग्रामस्थांच्या वतीने भूमिपुत्राचा हा पहिलाच सन्मान आ. काशिनाथ दाते यांच्या हस्ते व माजी आ. नंदकुमार झावरे यांच्या अध्यक्षतेखाली आणि जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे, ज्येष्ठ नेते सिताराम खिलारी, पोलीस उपअधिक्षक संपतराव भोसले, ज्येष्ठ पत्रकार शिवाजीराव शिर्के, मुंबई महानगर पालिकेचे प्रशासकिय अधिकारी किसनराव पावडे, प्रसिद्ध उद्योजक मच्छिंद्र लंके, विश्वनाथ कोरडे, प्रशांत गायकवाड, सचिन वराळ, डॉ. श्रीकांत पठारे, डॉ. भाऊसाहेब खिलारी आदींच्या उपस्थितीत होणार आहे.

# दरोडा टाकण्याआधीच दोघे पकडले

## रेकॉर्डवरील गुन्हेगारः गस्तीवर असताना कारवाई

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या सहा जणांपैकी दोघांना संगमनेर शहर पोलिस ठाण्याच्या गस्तीवर असलेल्या पथकाने पकडले. ही कारवाई बुधवारी (दि.२१) पहाटे नाशिक-पुणे महामार्गावर सावजी हॉटेलसमोरील उड्डाण पुलाखाली करण्यात आली. याप्रकरणी सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला असून ते रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक रवींद्र देशमुख यांनी दिली.

रोहन अनिल अभंग (वयः २७), सोनू ऊर्फ अथर्व संतोष दुधाने (वय : १९) (दोघेही रा. देवाचा मळा, संगमनेर), प्रेम विजय वाल्हेकर, निखिल ऊर्फ अजय विजय वाल्हेकर, जब्या वाल्हेकर (तिघेही रा. गुंजाळवाडी, ता. संगमनेर), अशफाक शेख (रा. अकोले नाका, संगमनेर) अशी गुन्हा दाखल झालेल्या सहा



जणांची नावे आहेत. त्यांच्याविरुद्ध पोलिस शिपाई सुरेश बाळू मोरे (नेमणूक, संगमनेर शहर पोलिस ठाणे) यांनी फिर्याद दिली आहे. अभंग आणि दुधाने यांना पोलिसांनी पाठलाग करून पकडले, उर्वरित चौघे पळून गेले. कारवाईत तलवार, दोन कोयते, फायटर, मोबाइल आणि दुचाकी असा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. ही कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रमुख, पोलिस उपनिरीक्षक समीर अभंग यासह पोलिस कर्मचारी आत्माराम पवार, सुरेश मोरे, शशिकांत दाभाडे, रोहिदास शिरसाठ, राहुल डोके आदींनी केली.

### अशी केली कारवाई

शहर पोलिस ठाण्याचे पथक गस्तीवर असताना त्यांना नाशिक-पुणे महामार्गावर सावजी हॉटेलसमोरील उड्डाण पुलाखाली काही जण संशयितरीत्या उभे असल्याचे दिसले. पोलिस त्यांच्यापर्यंत पोहोचताच ते दुचाकीवरून पळू लागले, पोलिसांनी पाठलाग करून दोघांना पकडले. त्यांच्याकडून दरोडा टाकण्यासाठी लागणारे साहित्य हस्तगत करण्यात आले, पकडलेल्या दोघांनी त्यांची आणि त्यांच्या साथीदारांची नावे सांगितली.

# मी सुमनताई शेळके यांच्याशी एकनिष्ठ -विष्णू भगत

**जनता आवाज वृत्तसेवा**



**पारनेर** : जीएस महानगर बँकेच्या निवडणूक संदर्भात माझ्या बाबतीत उठणाऱ्या वावड्या या खोट्या असून मी बँकेच्या अध्यक्षा श्रीमती सुमनताई गुलाबराव शेळके यांच्याशी एकनिष्ठ असून त्यांच्या विचारांशी माझी बांधिलकी कायम असल्याने मी त्यांच्या पॅनलचा उमेदवार म्हणून महानगर बँकेची निवडणूक लढवत आहे, असे स्पष्टीकरण सॉलिसिटर गुलाबराव शेळके व श्रीमती गुलाबराव शेळके पॅनलचे उमेदवार विष्णू सखाराम भगत यांनी केले.

जीएस महानगर बँकेच्या १८ जागांसाठी ४० उमेदवार नशीब अजिबात असताना, सॉलिसिटर गुलाबराव शेळके व सुमनताई गुलाबराव शेळके पॅनल कडून उमेदवारी करत असलेले विष्णू सखाराम भगत यांनी विरोधी गीतांजलीताई उदयराव शेळके यांच्या नेतृत्वाखाली सॉलिसिटर गुलाबराव शेळके संस्थापक पॅनलला पाठिंबा दिल्याच्या चर्चा व फोटो सोशल मीडियावर झळकल्याने महानगर बँक निवडणुकीत खळबळ उडाली. उमेदवार विष्णू भगत यांनी एक पत्र काढून त्यात म्हटले आहे की, मी जीएस महानगर बँकेची निवडणूक श्रीमती सुमन गुलाबराव शेळके यांच्या नेतृत्वाखाली पॅनलमधून लढत असून माझ्या उमेदवारी व पाठिंब्याच्या संदर्भात ज्या बातम्या येत आहे, त्या निराधार असून मी सुमनताई शेळके यांच्या पॅनलमधून उमेदवारी करत आहे. आमच्या पॅनलच्या सर्व उमेदवारांना विजयी करा, असा खुलासा वजा आवाहन उमेदवार भगत यांनी केला आहे.

# धामोरीत विजेच्या धक्क्याने गायी दगावल्या

## गोठ्यात विद्युत प्रवाह उतरल्याने घडली घटना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द :** धामोरी खुर्द येथे गायांच्या गोठ्यात वीज प्रवाह उतरल्याने चार गाई दगावल्याने शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले. धामोरी खुर्द येथील शेतकरी शिवाजी भागवत हरिश्चंद्रे हे धामोरी-वांबोरी रस्त्यावर शेतात राहत आहेत. त्यांनी घरापासून दीडशे फुटावर असलेल्या खांबावरून घरगुती वीज कनेक्शन घेतलेले आहे.



शनिवारी अवकाळीच्या वादळामुळे खांबावरून येणारे दोन वीज प्रवाह एकत्र झाल्याने त्यांच्या पत्राच्या गोठ्यात वीज प्रवाह उतरला. त्यामुळे एका गायीला विजेचा जोराचा धक्का बसल्याने ती गाय खाली कोसळली. गाय कोसळल्याचा आवाज आल्याने हरिश्चंद्रे हे गोठ्याजवळ गेले असता त्यांना इतर गायींचा थरकाप होत असल्याचे जाणवले. अशा अवस्थेत त्यांनी पडलेल्या गाईला उठवण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाही विजेचा धक्का बसला. मात्र त्यांनी प्रसंगावधान राखून गाईपासून बाजूला झाल्याने ते वाचले. परंतु या कालावधीत गोठ्यातील चार गायी विजेच्या धक्क्याने दगावल्या.

शिवाजी हरिश्चंद्रे अतिशय गरीब कुटुंबातील असून त्यांनी नुकतेच कर्ज काढून गायी खरेदी केल्या होत्या. या गाईच्या माध्यमातून ६० ते ७० लिटर दूध सुरू होते. त्यातून कर्जाचे हप्ते फेडून राहिलेल्या पैशात आपल्या कुटुंबाचा उदारनिर्वाह करत होते. परंतु अचानक काळाने घाला घातल्यामुळे त्यांच्या चार गायी दगावल्याने त्यांच्यावर आभाळ कोसळले आहे.

### दोन गाया वाचल्या

या गोठ्यामध्ये एकूण सहा गायी होत्या. परंतु दोन गायांच्या मध्ये मोठे अंतर असल्यामुळे त्या सुदैवाने वाचल्या. अतिशय कष्टातून व्यवसाय करणाऱ्या शिवाजी हरिश्चंद्रे या घटनेमुळे हतबल झाले आहेत. शासनाने हरिश्चंद्रे यांना झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

# शिरसगाव परिसरात बिबट्याने शेळी व कालवडीचा पाडला फडशा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील शिरसगाव येथील गवारेवस्ती या ठिकाणी दोन ते तीन दिवसांपासून बिबट्याने धुमाकूळ घातला असून येथील किशोर जिजाराम गवारे यांच्या वस्तीवरील गोठ्यात बांधलेल्या कालवडीवर रात्रीच्या सुमारास हल्ला करत शेतात काही अंतरावर ओढून नेले. यामध्ये कालवडीचा जागेवरच मृत्यू झाला.

परिसरात वारंवार पशुधनावर हल्ला होत असल्याने स्थानिक शेतकरी नागरिक यामध्ये घबरटीचे वातावरण निर्माण झाले. या घटनेची माहिती गवारे यांनी वैद्यकीय अधिकारी शिंदे तसेच वन अधिकारी विलास डगळे यांना देऊन पंचा समक्ष पंचनामा करण्यात आला. स्थानिक नागरिक सोमनाथ गवारे, किशोर गवारे, संजय गवारे, संजय फापाळे, अरुण कणसे, राधाकृष्ण आहेर, हर्षल गवारे, आदित्य गावरे, प्रसाद गवारे, मोहन गायकवाड आदी शेतकरी बांधवांनी पिंजरा लावण्याची मागणी केली आहे.

# लक्ष्मीनगरच्या शासकीय जागांचा प्रश्न सोडवावा -बोरावके

## उतारे देण्यासाठी महसूलकडे प्रस्ताव पाठवा

**जनता आवाज वृत्तसेवा**



**कोळपेवाडी** : कोपरगाव शहराच्या लक्ष्मीनगर भागातील शासकीय जागेवर राहणाऱ्या नागरीकांना त्यांच्या जागा शासकीय नियमाप्रमाणे नियमाकुल करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता करण्यात येवून आ. आशुतोष काळे यांच्या पाठपुराव्यातून शासनाच्या आवश्यक असणाऱ्या सर्व विभागांची मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे हे प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी तातडीने महसूल विभागाकडे पाठवावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी गटनेते विरेन बोरावके यांनी कोपरगाव नगरपरिषदेकडे दिलेल्या लेखी पत्राद्वारे केली आहे.

कोपरगाव शहरात लक्ष्मीनगर परिसरात मागील अनेक वर्षापासून शासकीय जागेवर अनेक कुटुंब वास्तव्य करीत आहे. ज्या शासकीय जागेवर हे कुटुंब राहत आहेत त्यांना त्यांच्या जागा शासन नियमानुसार नियमाकुल करून त्यांना त्यांच्या नावचे उतारे मिळावे, हा प्रश्न मागील काही वर्षापासून प्रलंबित होता. या नागरिकांच्या जागा शासन नियमानुसार नियमित करण्यासाठी आ. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगरसेवकांनी सातत्याने कोपरगाव नगरपरिषदेकडे पाठपुरावा करून वेळोवेळी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत या प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधले आहे. कोपरगाव नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांनी सर्व्हे करून, अतिक्रमित जागेची माहिती घेवून हे सर्व प्रस्ताव शासनाच्या विविध विभागाकडे मंजुरीसाठी पाठवीले होते. या प्रस्तावांना आवश्यक असणाऱ्या सर्वच विभागांची मंजुरी नुकतीच मिळाली असून हे प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी महसूल विभागाकडे पाठविले जावून त्यानंतर शासकीय जागेवर राहणाऱ्या नागरीकांना त्यांच्या जागेचे उतारे मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. या कामी आ. काळे यांनी पाठपुरावा केला होता.

# स्वामी समर्थ केंद्रातून संस्कारक्षम पिढी घडते

## दुर्गापूर बाल सेवेकऱ्यांनी दिला सांस्कृतिक कार्यक्रमातून संदेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : बालमनावर चांगले संस्कार केले तर यातून सुसंस्कृत अशी पिढी घडू शकते, हा अनुभव येतो तो दुर्गापूर येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रातील बाल संस्कार विभागाच्या माध्यमातून. या केंद्राचा २७ वा वर्धापनदिन विविध उपक्रमाने संपन्न झाला. यानिमित्ताने बालगोपाळांनी सादर केलेले सांस्कृतिक कार्यक्रम हे सर्व भाविकांच्या दृष्टीने आगळा वेगळा असाच ठरला.

या माध्यमातून दिलेला स्वामी संदेश आणि स्वामी सेवा केली तर आपण उच्च पातळीवरती जाऊ शकतो. हेच त्यांनी आपल्या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून सिद्ध करून दाखविले. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या माध्यमातून विज्ञान आणि अध्यात्म यांची सांगड घालून अध्यात्मातून सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी गावोगावी श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक विकास आणि बाल संस्कार केंद्र कार्यरत आहे. या केंद्राच्या माध्यमातून ग्राम अभियानाबरोबरच शेतीशास्त्र, विविध देव दैवतांची सेवा, विविध स्तोत्र- मंत्र आणि विशेषताः बालसंस्कारावरती विशेष भर दिला जातो.

दुर्गापूर या ठिकाणी मागील



२७ वर्षापासून कार्यरत असणाऱ्या श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या माध्यमातून बालसंस्कार केंद्र सुरू आहे. या बालसंस्कार केंद्राच्या माध्यमातून अनेक तरुण हे घडले आहेत. आज केंद्रातील अनेक विद्यार्थी हे वैद्यकीय, फार्मसी, कृषी त्याचबरोबर आयटी पर्यंत पोचले आहे. नुकताच केंद्राचा वर्धापनदिन विविध उपक्रमाने संपन्न झाला. यावेळी वयोगट ६ ते १८ या गटातील बालगोपाळांनी सादर केलेले सांस्कृतिक कार्यक्रम हे सर्वांसाठी प्रेरणादायी ठरले.

वर्धापन दिनानिमित्त संगमनेर तालुका सेवा केंद्राचे प्रमुख रावसाहेब शेजुळ यांनी स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. मंगेश मनकर यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. प्रा. भाऊसाहेब घोरपडे यांनी युवा प्रबोधन उपक्रमांची माहीती दिली.

यावेळी रावसाहेब शेजुळ, विखे पाटील वाहतूक संस्थेचे उपाध्यक्ष सुनील जाधव, प्रा.नंदकुमार भारती, प्रा.भाउसाहेब घोरपडे, केंद्र प्रतिनिधी मंगल पुलाटे, प्रवरा माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या संध्या रोकडे, ज्येष्ठ सेवेकरी वेणूनाथ पुलाटे, आदींसह पंचक्रोशीतील स्वामी समर्थ सेवेकरी आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रमेश जाधव यांनी तर सुत्रसंचालन प्रा.सोनाली पुलाटे यांनी केले.

मागील २७ वर्षापासून दुर्गापूर या ठिकाणी स्वामी समर्थ सेवा केंद्र कार्यरत आहे. या माध्यमातून विविध उपक्रम हे परिसरामध्ये सुरू असतात. बाल संस्कार विभाग हा केंद्राचा आत्मा राहिला आहे. या माध्यमातून आज बाल सेवेकऱ्यानी उंच भरारी घेत अनेक क्षेत्रात आपली उत्तुंग कामगिरी केली आहे. केंद्राच्या माध्यमातून विज्ञान आणि अध्यात्माची सांगड घालून येथील सेवेकरी आज उच्च पातळीवरती पोहोचले आहे.

# अमृतवाहिनी विद्यार्थ्यांना नोकऱ्या देण्यात अग्रेसर

## शरयू देशमुख; अमृतवाहिनी एमबीएच्या ९८ विद्यार्थ्यांची निकालापूर्वीच कॅम्पस प्लेसमेंटद्वारे निवड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : अमृतवाहिनी संस्थेने स्वतंत्र ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग कार्यरत केला असून या अंतर्गत विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कंपन्याशी समन्वय करार केला आहे. त्यामुळे या कंपन्या महाविद्यालयात येऊन कॅम्पस इंटरव्यू घेत आहेत. या मधून अमृतवाहिनी मधील विविध शाखांमधील विद्यार्थ्यांना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये चांगल्या पॅकेजवर नोकरी मिळाली असल्याचे संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त शरयू देशमुख यांनी सांगितले आहे.

अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या अमृतवाहिनी एमबीए महाविद्यालयाच्या सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात ९८ विद्यार्थ्यांची निकालापूर्वीच कॅम्पस प्लेसमेंटद्वारे विविध नामांकित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड झाली. या कंपन्यांमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना ३ लाखापासून ते ७ लाखापर्यंतचे वार्षिक पॅकेज मिळाले असल्याची अशी माहिती अमृतवाहिनी एमबीए महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. एम. लोंढे यांनी दिली.

### द्वितीय वर्षातील ९८ विद्यार्थ्यांची निवड

विविध नामांकित कंपन्यांमध्ये अमृतवाहिनी महाविद्यालयाच्या द्वितीय वर्षातील ९८ विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे. या सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्लेटमेंटसाठी अमृतवाहिनी एमबीएच्या वतीने संचालक डॉ.बी. एम. लोंढे, प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. विजय थोरात व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

### विविध मान्यवरांकडून विद्यार्थ्यांचे कौतुक

सर्व निवड झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब थोरात, विश्वस्त आ. डॉ. सुधीर तांबे, विश्वस्त शरयु देशमुख, इंद्रजीत थोरात, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, व्यवस्थापक प्रा. व्ही. बी. धुमाळ आणि संस्थेचे डायरेक्टर अकॅडेमिक डॉ.जे.बी. गुरव यांनी अभिनंदन केले.



शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या अमृतवाहिनी एमबीए महाविद्यालयाद्वारे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या करिअर जडणघडणीमध्ये नेहमीच मोलाचा वाटा उचललेला आहे. आत्तापर्यंत महाविद्यालयातून २५०० विद्यार्थ्यांनी एमबीए पदवी संपादित केलेली असून अशा या एमबीए महाविद्यालयाची स्थापना दूरदृष्टी नेतृत्व असलेले सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेमधून १९९४-१९९५ मध्ये झाली त्यानंतर माजी मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात व मा. आ. डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेने आतापर्यंत दैदीप्यमान यश संपादन केलेले आहे.

अमृतवाहिनी एमबीए महाविद्यालय हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी कायम संलग्नित असून महाविद्यालयाने सर्वच क्षेत्रात उच्च निकालाची परंपरा राखलेली आहे तसेच महाविद्यालयाने आय. एस. ओ. मानांकन प्राप्त केलेले असून इ.स. सन २०२४ मध्ये महाविद्यालयाने युजीसीचे नकचे "ए" ग्रेड मानांकन मिळवलेले आहे.

# पाथर्डी बस स्थानकावरून महिलेची पर्स चोरीला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : पाथर्डी येथील जुने बस स्टॅन्डवर एका पन्नास वर्षीय महिलेची पर्स चोरी होऊन त्यातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम लंपास झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

या प्रकरणी पाथर्डी पोलीस स्टेशनमध्ये अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाथर्डी तालुक्यातील आनंदनगर येथील रहिवासी वैशाली सोमनाथ सानप (वय ५०) या गृहिणी असून, त्या आपल्या पती आणि मुलासह राहतात. त्यांचा मुलगा ज्ञानेश्वर हा पुणे येथे कामानिमित्त वास्तव्यास आहे. वैशाली ह्या आपल्या मुलाला भेटण्यासाठी अधून मधून पुणे येथे ये-जा करत असतात.

दि.१९ मे रोजी सकाळी साडे दहा वाजण्याचा सुमारस वैशाली सानप ह्या पुण्याहून आपल्या मुलाला भेटून अहिल्यानगर येथे परतल्या. दुपारी साडे तीन वाजण्याच्या सुमारास त्या कल्याण-बीड मार्गे प्रवास करणाऱ्या एस.टी. बसमधून पाथर्डी येथील जुन्या बस स्टॅन्डवर उतरल्या. त्यावेळी पावसामुळे त्या बस स्टॅन्डवरील पत्र्याच्या शेडखाली थांबल्या. याचवेळी त्यांना चक्कर येऊन गुंगी आल्यासारखे वाटले. त्यानंतर त्यांनी रिक्षाने आनंदनगर येथील आपल्या घरी प्रवास केला.

घरी पोहोचल्यावर त्यांनी आपली पर्स घरात ठेवून विश्रांती घेतली. रात्री ९ वाजण्याच्या सुमारास जाग आल्यानंतर वैशाली यांनी आपल्या पर्सची तपासणी केली असता, त्यांना धक्का बसला. पर्सची खालची बाजू कापलेली होती.चोरीला गेलेल्या दागिन्यांमध्ये पाच तोळे वजनाचे गंठण, दोन तोळे वजनाचे नॅकलेस आणि पाच ग्रॅम वजनाची अंगठी हे मौल्यवान सोन्याचे दागिने आणि आठ हजार रुपये रोख रक्कम चोरी झाली होती.

पाथर्डी बस स्टॅन्डवर थांबले असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांच्या बगलेतील पर्सची खालची बाजू कापून त्यातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरली. असे वैशाली सानप यांनी पाथर्डी पोलीस स्टेशन मध्ये दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

# 'दादा पाटील'च्या ९ विद्यार्थ्यांना मिळाली नोकरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : कर्जत येथील रयत शिक्षण संस्थेच्या दादा पाटील महाविद्यालयात ऑक्सिजन बायोसायन्स प्राइवेट लिमिटेड, पुणे या कंपनीमधील संशोधन रसायनशास्त्रज्ञ या पदासाठी आयोजित मुलाखतीमध्ये महाविद्यालयातील ९ विद्यार्थ्यांची निवड झाल्याची माहिती प्राचार्य डॉ. संजय नगरकर यांनी दिली.

दि. १७ मे २०२५ रोजी रसायशास्त्र विभागाच्या वतीने या परिसर मुलाखतींच कॅम्पस इंटरव्यू चे आयोजन करण्यात आले. सदर परिसर मुलाखतींसाठी ऑक्सिजन बायोसायन्स कंपनीचे डॉ. दिगंबर बनकर, डॉ. शशिकांत भोरखडे आणि शशिकांत काळोंखे हे प्रतिनिधी उपस्थित होते.

सदर पदाच्या मुलाखतीसाठी रसायनशास्त्र विभागातील एम.एस्सी ऑर्गनिक केमिस्ट्री या वर्गातील एकूण ५२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यातील २५ विद्यार्थ्यांची निवड संशोधन रसायनशास्त्रज्ञ या पदासाठी योग्यता चाचणी व प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे करण्यात आली.

सदर परिसर मुलाखतीचे आयोजन यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय नगरकर यांचे बहुमूल्य मार्गदर्शन मिळाले. सदर परिसर मुलाखतीचे नियोजन व आयोजन करण्यासाठी रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. अशोक पिसे, प्रा. डॉ. अजित इंगळे व प्रा. डॉ. विकास भोसले यांनी परिश्रम घेतले.

### दिग्गज मान्यवरांकडून विद्यार्थ्यांचे कौतुक

निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष व संस्थेचे जनरल बॉडी सदस्य राजेन्द्र फाळके, जनरल बॉडी सदस्य आ. रोहित पवार, अंबादास पिसाळ, बप्पाजी धांडे, राजेन्द्र निंबाळकर व प्राचार्य डॉ. संजय नगरकर यांनी अभिनंदन करून त्यांचे कौतुक केले आहे.

### नऊ विद्यार्थ्यांचे अंतिम फेरीत निवड

अंतिम फेरीत संकेत, मुळीक, पांडुळे अभिषेक, कैलास थोरात, भाग्यश्री सोनटक्के, ऋतुजा शिंदे, कुंभार आकाश, झिटे रुचिका, यादव अस्मिता, टकले शिवशंकर या ९ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.



# खानापूर विद्यालयाचा लागला ७९.४१ टक्के निकाल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : खा . गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्था, अशोकनगर संचलित, जानकीबाई वामनराव आदिक माध्य. व उच्च माध्य. विद्यालय, खानापूर या विद्यालयाचा निकाल ७९.४१ टक्के लागला आहे.

प्रथम आदिक धनश्री दिगंबर(८८.६०), द्वितीय जाधव कीर्ती रामनाथ (८७.४०), तृतीय आदिक आदिती महेश(७८.८०) यांनी टक्के मिळविले आहेत.







त्याच्या यशाबद्दल विद्यालयाचे प्र.मुख्याध्यापक गवारे बी. आर. सर्व स्टाफ व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या चेअरमन पुष्पलता आदिक, सचिव अविनाश आदिक, माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिक, सहसचिव जयंत चौधरी, सुनील थोरात, नितीन पवार, हंसराज आदिक आदींजी अभिनंदन केले.

त्याचप्रमाणे शिक्षक पालक संघ, माता पालक संघ व ग्रामस्थ, माजी विद्यार्थी आणि पालकांनी विद्यालयाचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांचे भरभरून कौतुक केले.

# प्राजक्ताची इंडिया इन्शुरन्स कंपनीत वर्णी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा तालुक्यातील चिखली येथील ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्थेचे, श्री रामेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय सिताराम कोथिंबीरे यांची कन्या प्राजक्ता मनिषा संजय कोथिंबीरे हिची, केंद्र शासनाच्या युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीमध्ये प्रशासकीय अधिकारी वर्ग १ या पदावर निवड झाली.

संपूर्ण भारतातून १०० जागांसाठी झालेल्या पात्रता परीक्षा व इंटरव्यू व गुणवत्तेनुसार प्राजक्ताची निवड झाली. प्राजक्ताने यापूर्वी शासकीय कृषी महाविद्यालय धुळेमधून २०२२ मध्ये बीएससी ॲग्री ही पदवी घेतली. त्यानंतर स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू केला.

तिची चालू वर्षामध्ये आयडीबीआय बँकेत एक्झिक्यूटिव्ह, बँक ऑफ इंडियामध्ये आयबीपीएस असिस्टंट व युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीमध्ये प्रशासकीय अधिकारी (वर्ग-१) अशा ३ ठिकाणी निवड झाली आहे. प्राजक्ताचा या यशाबद्दल सहकार महर्षी नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सोनिया गांधी, छत्रपती व ज्ञानदीप शिक्षण संस्थेचे इन्स्पेक्टर, प्राचार्य व मुख्याध्यापक उपस्थित होते.

महिला व बालकल्याण समितीच्या मा. सभापती अनुराधा नागवडे, बाबासाहेब भोस, अण्णासाहेब शेलार, सह आयुक्त अरुण आनंदकर, डीवायएसपी कांतीलाल कोथिंबीरे यासह आदींनी तिचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# माळी बाभूळगावातील ग्रामस्थांच्या आंदोलनाला अखेर यश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : पाथर्डी तालुक्यातील माळी बाभूळगाव येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ वर स्पीड ब्रेकर बसविण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थांनी बुधवारी सकाळी रस्ता रोको आंदोलन केले. ग्रामस्थांच्या या आंदोलनाला तात्काळ यश मिळाले असून, राष्ट्रीय महामार्ग उपविभाग, पाथर्डी येथील उपविभागीय अभियंत्यांनी ही मागणी मान्य केल्याने आंदोलन मागे घेण्यात आले.

### मागणी मान्य झाल्याने ग्रामस्थ समाधानी

गावातील रस्ता सुरक्षेचा प्रश्न लवकरच सुटणार असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. तर राष्ट्रीय महामार्ग उपविभागाने ग्रामस्थांना कायदा व सुव्यवस्था राखण्याचे आवाहन केले असून, नियोजित वेळेत काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे.

माळी बाभूळगाव ग्राम पंचायतीने यापूर्वी २४ फेब्रुवारी, १९ मार्च आणि १६ मे २०२५ रोजी निवेदनाद्वारे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ वर गतिरोधक (स्पीड ब्रेकर) बसविण्याची मागणी केली होती. या मागणीला प्रतिसाद देताना राष्ट्रीय महामार्ग उपविभागाने (मेहेकरी ते भूतेटाकळी) या प्रोजेक्टचे काम पूर्ण झाल्याची माहिती दिली. तसेच, ग्रामस्थांनी सुचवलेल्या ठिकाणी गतिरोधक बसवण्याचे काम त्वरित सुरू करून ५ जून पर्यंत पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.



आंदोलनादरम्यान सरपंचांसह रविंद्र वायकर, आर.बी. शेख, अक्षय शिरसाट, अनिल तिजोरे, संदीप वायकर, रामनाथ कोलते, सचिन वायकर यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. प्रशासनाने तात्काळ मागणी मान्य केल्याने ग्रामस्थांनी आंदोलन स्थगित करून प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले.

# 'त्या' हॉस्पिटलच्या पार्किंगअभावी वाहतूक कोंडी?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : शहराच्या मध्यवर्ती व वर्दळीच्या भागात असलेल्या जुना बाजार रोड, चाँद सुलताना हायस्कूलच्या शेजारी खासगी रुग्णालयास पार्किंगची कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्यामुळे परिसरात वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. रुग्णालयासमोर रस्त्यावर थेट वाहने उभी केल्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. संबंधित हॉस्पिटलवर कारवाई व्हावी, या मागणीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई गट) च्या वतीने महापालिके समोर उपोषण करण्यात आले.

### रुग्णालयास अन्यत्र स्थलांतरित करा

पार्किंगची सुविधा नसताना अशा रुग्णालयाला परवानगीच कशी देण्यात आली? तातडीने या प्रकरणाची चौकशी करून रुग्णालयावर कारवाई करावी, पार्किंगची योग्य व्यवस्था न केल्यास रुग्णालयास अन्यत्र स्थलांतरित करण्याची मागणी रिपाईच्या वतीने करण्यात आली आहे.

### रुग्णालयाला वाहनतळ असणे बंधनकारक

नियमानुसार कोणत्याही रुग्णालयाकडे स्वतःचा वाहनतळ असणे बंधनकारक आहे. मात्र, सदर रुग्णालयाने या नियमाचे उल्लंघन करत थेट रस्ताच वाहनतळ बनविला आहे. परिणामी नागरिकांना वाहतूक कोंडी व अपघातांना सामोरे जावे लागत आहे.




या उपोषणात स्वप्निल साठे यांच्यासह रिपाईचे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, विकास पटेकर, संदीप वाघचौरे, अजय खरात, विजय शिरसाठ आदी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

सदर रुग्णालयाप्रकरणी यापूर्वीही तक्रारी व निवेदने देण्यात आली, मात्र प्रशासनाकडून कोणतीही ठोस

### खासगी रुग्णालयावर कारवाईसाठी रिपाईचे महापालिकेसमोर उपोषण

कारवाई करण्यात आलेली नाही. यामागे महापालिकेतील काही अधिकाऱ्यांचे आर्थिक हितसंबंध असल्याचा आरोप करण्यात आला आहे. चाँद सुलताना हायस्कूल शेजारी असलेल्या या खासगी रुग्णालयात रुग्णांची नेहमीच गर्दी असते.

रुग्णांच्या नातेवाइकांची चारचाकी आणि दुचाकी वाहने सर्रासपणे मुख्य रस्त्यावर लावली जातात. याच रस्त्यावर शाळा, चर्च, मंदिर आणि व्यापारी दुकाने असल्याने दिवसभर वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होतो.

# बाबुर्डी रस्त्यासाठी आमरण उपोषणाचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : रस्ते सुशोभीकरण अंतर्गत श्रीगोंदा नगरपरिषद हद्दीतील १७ पैकी १६ रस्त्यावरील डिव्हाडरमध्ये माती भरून त्यात झाडे लावण्यात आली असताना सावतानगर कडे जाणाऱ्या बाबुर्डीरस्त्याकडे मात्र प्रभागातील नगरसेवक व नगरपालिका प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे.

बाबुर्डी रोडवरील डिवायडर अस्त व्यस्त अवस्थेत पडलेले असुन काही ठिकाणी ब्लॉग बसविलेले नाहीत. डिवायडरमध्ये मोठ-मोठे काट्यांची झाडे व अन्य प्रकारचे झाडे उगवलेली असुन ते रस्त्यावर अस्तव्यस्त अवस्थेत पसरली आहेत. काट्याच्या रस्त्यावर येत असल्याने नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्याचे दिवस सुरू होत आहे तरी वरील बाबींचा गांभीर्यपूर्वक विचार करून लवकरात लवकर काम चालू करण्यात यावे व आमच्या मागणीचा विचार न केलेस आम्ही ग्रामस्त दि. ९ जून २०२५ रोजी आपले श्रीगोंदा नगरपरिषद कार्यालया समोर आमरण उपोषणाला बसणार असून होणाऱ्या परिणामाची सर्वस्वी जबाबदारी शासनावर राहील.



निवेदनावर आशिष बनसुडे, अक्षय जगधने, स्वप्निल डोके, सागर खेतमाळीस, युवराज तांबे, संदिप बोरुडे, सुधीर खेडकर, माधव बोरुडे, कांतीलाल कोकाटे, शिवाजी राऊत, अक्षय शेंडगे, अजिक्य वऱ्हाडे, सागर खेतमाळीस, पोपट जाधव, आकाश शिंदे, रोहित देवकर, तुषार लषकरे, अनिल खेतमाळीस, सागर संपत साळुंके, वैभव बनसुडे, संकेत बनसुडे, रविकुमार डाके, संतोष खेतमाळीस, पंकज बनसडे यांच्यासह प्रभागातील नागरिकांच्या सह्या आहेत.

# ज्ञानसाधना गुरुकुलकडून निकालाची परंपरा कायम

## मनोज कोतकर; ज्ञानसाधना गुरुकुलचा इयत्ता दहावीचा १०० टक्के निकाल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : केडगाव मधील ज्ञानसाधना बहुउद्देशीय व सेवाभावी संस्था संचलित ज्ञानसाधना गुरुकुल क्लासेसचा इयत्ता १० वी बोर्डाचा निकाल १०० टक्के लागला असून, विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. कु. वैष्णवी औशीकर ९७ टक्के गुण मिळवून प्रथम आली. रेवती साबळे ९४ टक्के गुण मिळवून द्वितीय तर सिद्धनीता डंबाळे ९३ टक्के गुण मिळवून तृतीय आली.

तसेच अदिती कांडेकर ९३ टक्के, कीर्ती बोरुडे ९२ टक्के, सेजल शिंदे ९१ टक्के, प्रसाद डमाळे ९१ टक्के, गौरी शेळके ९० टक्के, मानसी वाबळे ९० टक्के, अचल धरम ८८ टक्के,

> ज्ञानसाधना गुरुकुलने १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली असून, या क्लासमधून नेहमीच चांगले गुण मिळवून विद्यार्थी बाहेर पडत असतात. मागील वर्षी सुद्धा ९७ टक्के गुण मिळवणारी मुलगीच पहिली होती, तर याही वर्षी ९७ टक्के गुण मिळवणारी मुलगीच पहिली आली आहे. त्यामुळे पालकांनी मुलींना चांगले शिक्षण द्यावे.
>
> **– मनोज कोतकर,** स्थायीचे माजी सभापती




भाग्यश्री चेमटे ८८ टक्के, वैष्णवी खंडागळे ८७.४० टक्के यासह आदींनी गुण मिळवून यशस्वी झाले. यशस्वी विद्यार्थ्यांचा केडगाव ग्रामस्थ तसेच मनपा स्थायीचे माजी सभापती मनोज कोतकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाप्रसंगी संभाजी पवार, मुख्याध्यापक संदीप भोर, मुख्याध्यापक दत्तात्रय साकोरे, छबूराव कोतकर, बच्चन कोतकर, भैरू कोतकर, सुमित लोंढे, आण्णा शिंदे, अजित कोतकर, कुणाल चिपाडे, प्रवीण आव्हाड, शिवाजी मोढवे, बंटी वीरकर, प्रसाद जमदाडे आदी मान्यवर उपस्थित होते. आभार संदीप भोर यांनी मानले.

# बँकांनी शेतकऱ्यांची कर्जवसुली थांबवावी: पोटफोडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : एकीकडे शासन कर्ज वसुली बद्दल बोलून मते मिळवते व आता बँकेमार्फत शेतकऱ्यांकडून सक्तीची वसुली हे करत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची सक्तीची कर्ज वसुली बँकांनी थांबवावी अन्यथा जनशक्ती रस्त्यावर उतरून याचा विरोध करेल असे प्रतिपादन जनशक्तीचे कार्याध्यक्ष रामजी पोटफोडे यांनी केले आहे.

दि. २१ रोजी बेलगाव येथे जनशक्ती विकास आघाडीच्या नूतन शाखेचा उद्घाटन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

या कार्यक्रमास राजेंद्र फलके, रामकिसन घनवट, बंडू लोहकरे, राजेंद्र थोरात, त्र्यंबकराव त्रिंबके, प्रमुख उपस्थितीत होते. यावेळी शाखेचे अध्यक्ष म्हणून नवनाथ पोपळे, सचिव अर्जुन जाधव, कार्याध्यक्ष लक्ष्मण लोहकरे, सचिव पांडुरंग जाधव, सदस्य मोतीराम लोहकरे, संजय थोरात, अशोक पालवे,



बाळासाहेब जाधव, योगेश जाधव, हरिभाऊ लोहकरे, शरद जाधव, वैभव खरात यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या.

पोटफोडे पुढे म्हणाले की, सध्या शेतकऱ्यांच्या अन्यायावर बोलायला कोणीच तयार नाही. सर्व सत्तेत जाऊन बसले आहेत. शेतकऱ्यांना पिक विमा भरपाई मिळाली परंतु बँकेने शेतकऱ्यांच्या खात्याला होल्ड लावले असून शेतकऱ्यांची कर्ज वसुली सक्तीने चालू केली आहे. हा शेतकऱ्यांवर अन्याय चालू आहे.

सत्तेवर येण्यासाठी कर्जमाफीची खोटी आश्वासने देऊन सत्ताधारी शेतकऱ्यांची भरभरून मते मिळवून सत्तेवर आले आणि आता शेतकऱ्यांना वाटले कर्जमाफी होणार म्हणून कोणीच शेतकऱ्यांनी कर्ज भरले नाही. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाऊराव जाधव यांनी केले. तर आभार शरद जाधव यांनी मानले.

> शेतकरी कपाशी, तूर, सोयाबीन, कांदे, ऊस आदि शेतमालाला भाव नसल्याने व अवकाळी लहरी हवामानामुळे सतत आर्थिक संकटात आहे. आता तो कर्ज भरू शकत नाही. त्यामुळे सक्तीची कर्ज वसुली बँकांनी करू नये. अन्यथा जनशक्ती मोठे आंदोलन करून सक्तीची कर्ज वसुलीला विरोध करणार आहे.
>
> **– रामजी पोटफोडे**

# बोगस बियाणे, खत विक्रेत्यांवर होणार कारवाई

## भरारी पथकाची नेमणूक; व्यापाऱ्यांविरुद्ध थेट गुन्हे दाखल करणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : तालुक्यातील बोगस बियाणे, खत विक्रेत्यांवर कारवाई होणार असल्याने शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांची भंबेरी उडाली आहे. जामखेड तालुक्यात ६४ हजार २५ हेक्टरवर खरिपाची पेरणी होणार असून, खरीप हंगामासाठी सोयाबीन २२ हजार ५०० हेक्टर, उडीद २८ हजार हेक्टर, तर तूर १० हजार ५०० हेक्टर या पिकांचे नियोजन करण्यात आले आहे. मात्र, ऐन पेरणीच्या वेळी खत, बियाणांची होणारी साठेबाजी, तसेच बोगस बियाणे आणि खतांची विक्री करणारे रॅकेट सक्रिय होते. या पार्श्वभूमीवर कृषी विभागही सज्ज झाला आहे. बनावट बियाणे, अवैध आणि विनापरवाना खते, जादा दराने खते आणि बियाणांची विक्री करणाऱ्यांवर थेट कारवाई करण्यासाठी तालुकास्तरीय



भरारी पथकांची स्थापना करण्यात आली. बोगस माल जप्त करणे आणि संबंधिताविरुद्ध पोलिसांत गुन्हा नोंदविणे, अथवा न्यायालयात थेट खटला भरण्याचे अधिकार या पथकांना देण्यात आले आहेत. दरवर्षी खरीप हंगामात शेतकऱ्यांना बनावट रासायनिक बियाणे, खते विक्री करून स्वतःचे उखळ पांढरे करून घेणारे लोक सक्रिय होतात. एवढेच नव्हे तर परवानाधारक दुकानदार शेतकऱ्यांना अनुदानित रासायनिक खत आणि बियाणे विक्री करण्यासाठी अन्य माल घेण्याची सक्ती करतात. अशाप्रकारे लिंकिंग करून शेतकऱ्यांना लुबाडले जाते. असे प्रकार रोखण्यासाठी जामखेड तालुका कृषी अधिकारी रवींद्र घुले यांच्या मार्गदर्शनाखाली एक तालुकास्तरीय भरारी पथक स्थापन केले आहे. तालुका कृषी अधिकारी रवींद्र घुले या पथकाचे प्रमुख आहेत. या पथकात जामखेड मंडळाचे कृषी अधिकारी कोमल हिरडे, नान्नज मंडळाचे कृषी अधिकारी जनार्दन सरोदे, खर्डा मंडळाचे कृषी अधिकारी प्रफुल्ल पाटील, कृषी अधिकारी अशोक गीते, वजन मापे निरीक्षक एन. टी. भावसर हे सदस्य आहेत. जामखेड पंचायत समितीचे तालुका कृषी अधिकारी अशोक शेळके हे या पथकाचे सचिव आहेत.

### भरारी पथकात सात अधिकारी

तालुकास्तरीय भरारी पथकात सात अधिकारी आहेत. यात तालुका कृषी अधिकारी हे पथक प्रमुख असतील, तर पंचायत समितीचे तालुका कृषी अधिकारी सदस्य सचिव आहेत. चार मंडळ कृषी अधिकारी आणि तसेच वैधमापन शास्त्र विभागाचे निरीक्षक हे सदस्य आहेत.

### तीन कृषी सेवा केंद्रांमागे एक कृषी सहायक

प्रत्येक तीन कृषी सेवा केंद्रांमागे एक कृषी सहायक नियुक्त करण्यात येणार आहे. हे सहायक शेतकऱ्यांना बियाणे, खते, औषधे याविषयी माहिती देतील. त्याचप्रमाणे बोगस माल ओळखण्यासाठी मदत करतील. शेतकऱ्यांच्या तक्रारी त्वरित संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारीही त्यांच्याकडे असेल.

# पालवेंची इंडियन फॉरेस्टमध्ये घवघवीत कामगिरी




**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : हरीओम दगडू पालवे यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाद्वारे २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इंडियन फॉरेस्ट सर्व्हिसेस परीक्षेत घवघवीत यश मिळवले असून त्यांची अखिल भारतीय सेवा गट-अ पदावर निवड झालेली आहे. या यशामुळे पालवे कुटुंबासह संपूर्ण जिल्ह्यात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण आहे.

हरीओम पालवे यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, महालक्ष्मीवरे (ता. नेवासा) येथे झाले. त्यानंतर त्यांनी माध्यमिक शिक्षण पाथर्डी येथील श्री तिलक जैन विद्यालयात पूर्ण केले आणि संगणक शास्त्र शाखेतील पदवी डी. वाय. पाटील महाविद्यालयातून प्राप्त केली आहे. स्पर्धा परीक्षांमध्ये हे त्यांचे सलग तिसरे यश ठरले आहे. केवळ सहा महिन्यांपूर्वीच त्यांची निवड पुरवठा अधिकारी म्हणून झाली होती आणि सध्या ते राहाता येथे कार्यरत आहेत.

त्याचबरोबर महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत घेतलेल्या राज्यसेवा परीक्षेतही त्यांची सहाय्यक गटविकास अधिकारी म्हणून निवड झाली होती. हरीओम पालवे हे सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी डी. के. पालवे यांचे सुपुत्र असून, पाथर्डी तालुक्यातील प्राथमिक शिक्षक महादेव पालवे गुरुजी यांचे पुतणे आहेत.

# चिचोंडीच्या उपसरपंचपदी संदीप गरुड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी** : पाथर्डी तालुक्यातील चिचोंडी ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी संदीप विलास गरुड यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. ग्रामपंचायत कार्यालयामध्ये सरपंच श्रीकांत आटकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या उपसरपंच पदाच्या निवडी प्रसंगी मावळते उपसरपंच इमरान शेख यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर त्यांनी उपसरपंच पदाचा राजीनामा दिला.

त्यानंतर सत्ताधारी गटाकडून संदीप गरुड यांना उपसरपंच पदाची संधी देण्यात आली आहे. गेल्या ३० वर्षापासून मिरी तिसगाव नळ योजनेचे अध्यक्ष एकनाथ आटकर यांच्याकडे चिचोंडी ग्रामपंचायतची एक हाती सत्ता आहे. गावात केलेल्या विकास



### निवडीप्रसंगी यांची होती उपस्थिती

या निवडी प्रसंगी ग्रामपंचायत सदस्य सुदर्शन गायकवाड, द्वारकाबाई आव्हाड, अंबिका दानवे, सपना तुपे, आशाबाई जराड, सोनाली फुलमाळी, वंदना भिंगारदिवे, यांच्यासह सत्ताधारी गटाचे नेते एकनाथ आटकर, ज्येष्ठनेते विठ्ठल गायकवाड, युवा नेते संदीप दानवे, अशोक कांबळे, शिवाजी भिंगारदिवे, पिनू भिंगारदिवे, बबलू इप्परकर, राजू गरुड, जालिंदर भिंगारदिवे यांच्यासह अनेक कार्यकर्ते व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

कामाच्या जोरावर आटकर यांनी ग्रामपंचायतीची सत्ता राखून ठेवली असून सरपंच उपसरपंच पदासह सर्व ग्रामपंचायत सदस्य आटकर गटाचे असल्यामुळे इमरान शेख यांनी राजीनामा दिल्यानंतर उपसरपंच पदाची संधी कोणाला मिळणार, याची चर्चा सुरू असताना संदीप गरुड यांचे उपसरपंच पदासाठी नाव श्रेष्ठीकडून पुढे आले.

# समता परिषदेतून भुजबळांनी कार्यकर्त्यांचे जाळे विणले

## कोषाध्यक्ष अमृता रसाळ; पारनेर तालुक्याच्या वतीने भव्य सन्मान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : समता परिषदेचे अध्यक्ष व राज्याचे नेते छगनराव भुजबळ यांची महाराष्ट्र राज्य मंत्रीमंडळात वर्णी लागल्याबद्दल त्यांचा पारनेर तालुक्याच्या वतीने मोठ्या जल्लोषात भव्य सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा सौ रुपाली चाकणकर होत्या. यावेळी ना. छगनराव भुजबळ यांचा पारनेर तालुका समता परिषदेच्या वतीने सन्मान केला.

या सन्मान सोहळ्या प्रसंगी श्री मळगंगा देवस्थान ट्रस्टचे कोषाध्यक्ष



अमृता रसाळ हे भुजबळ यांचा गौरव करताना म्हणाले की, भुजबळ यांच्या सारख्या लढवय्या नेत्याने समता परिषदेच्या माध्यमातून राज्यातील कार्यकर्त्यांची एकजूट करून राज्यभर कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण करून विकासाचा अनुषेश भरून काढला.

अशा झुंजार नेत्याला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुन्हा मंत्रीपद देऊन सन्मान केला. तर पारनेर पंचायत समितीचे माजी उपसभापती खंडू भुकन म्हणाले की, भुजबळ हे आमची ताकद असून त्यांना पुन्हा मंत्रीपद देऊन कार्यकर्त्यांना ऊर्जा मिळाली आहे. पारनेर बाजार समिती चे सभापती किसनराव रासकर, समता परिषदेचे पदाधिकारी सुभाष लोंढे व इतर मान्यवर आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# नेवासा पंचायत समितीचा द्वितीय क्रमांक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : राज्य शासनाच्या १०० दिवस कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम अंतर्गत नेवासा पंचायत समितीने नाशिक विभागातून गौरवपूर्ण द्वितीय क्रमांक पटकावला आहे. ही कामगिरी संपूर्ण नेवासा तालुक्यासाठी अभिमानास्पद असून, कार्यक्षम प्रशासन आणि टीमवर्कचे हे उत्तम उदाहरण ठरले आहे.

> ‘ही उपलब्धी केवळ प्रशासकीय यंत्रणेची नसून, प्रत्येक अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्तरावरील कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित आहे. अशा प्रकारच्या उपक्रमातून पंचायत समिती स्तरावरील कार्यक्षमता वाढवून नागरिकांना उत्कृष्ट सेवा देण्याचा आमचा उद्देश आहे.
>
> **संजय लखवाल, गटविकास अधिकारी**

या यशामागे सतत मार्गदर्शन करणारे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मन:पूर्वक आभार. तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. त्याबद्दल त्यांचेही मन:पूर्वक आभार व्यक्त करण्यात येत असल्याचे गटविकास अधिकारी संजय लखवाल यांनी सांगितले. नेवासा पंचायत समितीतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि संघभावनेने कार्य करत हे यश मिळवले आहे.

त्याचप्रमाणे, ग्रामस्तरावर कार्यरत सर्व ग्रामपंचायत अधिकारी आणि इतर कर्मचाऱ्यांनी देखील आपल्या जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडून या कामगिरीत मोलाचा वाटा उचलला आहे.

# सरन्यायाधीश गवई यांना देवगड भेटीचे निमंत्रण

**जनता आवाज वृत्तसेवा**



**नेवासा** : ज्येष्ठ न्यायाधीश भूषण गवई यांची सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदी निवड झाल्याबद्दल नेवासा तालुक्यातील भूलोकीचा स्वर्ग असलेल्या गुरूदेव दत्तपीठ देवगड संस्थानच्या वतीने भास्करगिरी महाराज यांनी भूषण गवई यांना पत्र पाठवून त्यांचे अभिनंदन केले आहे. भूषण गवई यांची सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदी झालेली निवड ही महाराष्ट्राचा सन्मान वाढवणारी बाब असल्याचे भास्करगिरी महाराज यांनी पाठवलेल्या अभिनंदन पत्रात म्हटले आहे तर देवगड भेटीचे ही निमंत्रण अभिनंदन पत्रात दिले आहे. पत्रात म्हटले आहे की भारतीय संविधानाने ठरवून दिलेल्या न्याय व्यवस्थेमध्ये सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती म्हणून आपली सन्मानपूर्वक झालेली नियुक्ती ही संपूर्ण महाराष्ट्राचा सन्मान करणारी बाब ठरली आहे. न्यायदेवतेच्या रूपाने भारतमातेची सेवा आपल्या हातून घडत आहे. आपण आपल्या कामाप्रती जो आदर व निष्ठा बाळगली त्याचेच हे फलित आहे. आपल्या रूपाने न्यायव्यवस्थेच्या सन्मानात आणखीनच भर पडेल असा आम्हास विश्वास आहे.आपल्या कार्यव्यस्ततेतून संयुक्तिक वेळ ठरवत भगवान दत्तात्रेयांचे दर्शनाचे नियोजन करावे, त्या निमित्ताने सर्व भक्तमंडळाच्या वतीने आम्हास आपला यथोचित सन्मान करता येईल असे ही निमंत्रण देवगड येथे येण्यासाठी बाबांनी त्यांना दिले आहे.

# शौर्यला रौप्य तर स्वराला कास्य पदक

## नॅशनल कुडो चॅम्पियनशिप स्पर्धा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : नुकतीच ३ री कुडो नॅशनल चॅम्पियनशिप कप स्पर्धा ही पुणे येथे नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिकी विद्यालय फूलगाव, हवेली पुणे येथे मोठ्या उत्सवात पार पडली.

या स्पर्धेसाठी भारतामधून २६ राज्यांमधून जवळपास १००० च्या वरती स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत पाथर्डी तालुक्यातील जांभळी येथील पद्माकर शिरसाट (मा. सरपंच जांभळी) यांचे नातु व विद्यमान ग्रा. पं. सदस्य किरण शिरसाट यांचे चिरंजीव शौर्य शिरसाट यांनी मुंबई शहरकडून




खेळून १४ वर्षाखालील स्पर्धेत रौप्य पदक मिळवले आहे. तसेच स्वरा शिरसाट यांनी ११ वर्षाखालील स्पर्धेत कास्य पदक मिळवले आहे. या दोघांचाही सर्वच स्तरातून शौर्य व स्वरा यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. शौर्य व स्वरा हे मुंबई शहर महाराष्ट्र कडून खेळत असून शौर्य यांची आई खुशी किरण शिरसाट ह्या मुंबई पोलीस दलात आपली सेवा बजावत आहे.

# गोवंश प्राणी घेऊन जाणारा टेम्पो पकडला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव शहर** : कोपरगाव शहरातील येवला रोड जवळील शितल हॉटेल समोर गोवंशाची अवैधरीत्या वाहतूक करणारा टेम्पो पोलिसांनी पकडला. या प्रकरणी दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. कोपरगाव -येवला रस्त्यावर एका टेम्पोमधून अवैधरीत्या जनावरांची वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसांनी मिळाली. पोलिसांनी या रस्त्यावर सापळा लावला असता एका टेम्पोमध्ये विनापरवाना निर्दयपणे १६ पारड व १ हेला दाटीवाटीने टेम्पो भरून वाहतूक करतांना मिळून आले. सदर गोवंश व टेम्पो यांची आजच्या बाजार भाव नुसार किंमत ११ लाख २४ हजाराचा मुद्देमाल ताब्यात घेतला असून वाहतूक करणाऱ्या सुफियान इददु शेख (रा. कुरण, तालुका संगमनेर) तसेच मोहम्मद इब्रान अब्दुल रशीद (रा. गजाननगर मालेगाव) यांना कोपरगाव शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. सदर आरोपींवर प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियम कायद्यानुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास कोपरगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक भगवान मथुरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल बी.एच तमनर हे करीत आहे.

# शेवगावमध्ये तिरंगा रॅलीस प्रतिसाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : सरकारकडून राज्यभरात भारतीय सैन्य दलाच्या समर्थनार्थ तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात येत असून, शेवगावमध्येही तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या तिरंगा रॅलीला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. आमदार मोनिका राजळे यांच्या प्रमुख उपस्थितीत येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात येऊन तिरंगा रॅलीस सुरवात करण्यात आली. ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारतीय सैन्याने गाजवलेल्या पराक्रमाचा गौरव करण्यासाठी तसेच वीर सैनिकांच्या शौर्याला



अभिवादन करण्यासाठी बुधवारी शेवगाव शहरातून भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. शहरातील खालाची वेस येथील शनि मारतीमंदिरातील सभागृहात रॅलीची सांगता करण्यात आली. सांगता सभेत आ. राजळे यांनी उपस्थितांना संबोधित केले. आ. राजळे म्हणाल्या की, भारतीय सैन्य दलाचे मनोबल उंचावण्यासाठी आणि त्यांच्या साहसाचे कौतुक करण्यासाठी ही तिरंगा रॅली आयोजित करण्यात आली आहे. देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या जवानांच्या कर्तृत्वाला आम्ही सलाम करतो. रॅलीमध्ये माजी सैनिक, नगरपरिषद, वन विभाग, महसूल, सार्वजनिक बांधकाम, पोलीस, अंगणवाडी, भाजपाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. भारत मातेच्या जयघोषात परिसर दुमदुमून गेला.

# दोन विवाहित महिलांचा सासरी छळ

## पीडितांच्या फिर्यादीवरून पोलिसांत गुन्हे दाखल

**जनता आवाज वृत्तेसवा**

**अहिल्यानगर** : दोन विवाहित महिलांनी आपल्या पती व सासरच्या मंडळीविरूध्द शारीरिक, मानसिक छळ, मारहाण, हुंड्याची मागणी व जीवे मारण्याच्या धमकी दिल्याप्रकरणी पोलीस ठाण्यात फिर्यादी दाखल केल्या असून, दोन्ही घटनेवरून तोफखाना व भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात स्वतंत्र गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

नागापुर, गोरे मळा येथे राहणाऱ्या विवाहितेने तोफखाना पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचे पती खंडेराव शामराव गुट्टे (रा. डोंगरगाव, ता. पालम, जि. परभणी) व त्यांच्या सासरच्यांनी २०१५ ते २०२१ दरम्यान फिर्यादीला वेळोवेळी मारहाण, उपाशी ठेवणे, हुंड्याची मागणी व शेवटी घरातून हाकलून देणे असे प्रकार केले. तसेच पतीने दुसरे लग्न करून दुसरी पत्नी भाग्यश्रीनेही (पूर्ण नाव, पत्ता माहिती नाही) फिर्यादीस जीवे मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणी खंडेराव गुट्टे, भाग्यश्री, कमलबाई शामराव गुट्टे, प्रभाकर भिमराव गुट्टे (सर्व रा. डोंगरगाव, ता. पालम, जि. परभणी), शोभा गजानन हुलगे (रा. गेवराई, जि. बीड) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसऱ्या प्रकरणात सोलापूर रस्ता, दरेवाडी (ता. अहिल्यानगर) येथे राहणाऱ्या विवाहितेने भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

त्यांच्या पती दिनेश अशोक सोनवणे व सासरच्यांनी २०२२ ते २०२४ या कालावधीत फिर्यादीला वारंवार छळ, मारहाण व पाच लाख रूपयांच्या मागणीसंदर्भात त्रास दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. यावरून दिनेश सोनवणे, मंगल अशोक सोनवणे, अशोक पुंडलिक सोनवणे, गौरव अशोक सोनवणे (सर्व रा. नाशिक रस्ता, पवारवाडी, नाशिक) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवावी

## आव्हाड; गुणवंत विद्यार्थ्यांचा श्री विवेकानंद विद्यामंदिरात सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : शालेय जीवनातील दहावी हा टप्पा अत्यंत महत्त्वाचा असून विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंदांचा आदर्श ठेवून जीवन ध्येयवादी व प्रयत्नशील बनवावे. आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून पुढील वाटचालीसाठी उद्दिष्ट ठरवावे, असे प्रतिपादन पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड यांनी केले. श्री विवेकानंद विद्यामंदिर, पाथर्डी येथे पार्थ विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने मार्च २०२५ च्या दहावीच्या एस. एस. सी. परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या




गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ नुकताच संपन्न झाला. त्यावेळी आव्हाड बोलत होते. यावेळी मुख्याध्यापक शरद मेढे, समन्वयक ज्ञानेश्वर गायके, महेंद्र तांदळे, नंदकुमार झेंड, रेश्मा सातपुते, अर्चना दराडे हे उपस्थित होते. यावेळी दहावीतील सर्व विषय शिक्षकांचा पालक व संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अभिजीत सरोदे, सतीश डोळे, संदीप धायतडक, स्नेहल बोराडे, विठ्ठल धस, तुषार शिंदे, राधा आव्हाड, प्रमोद हंडाळ, शशांक महाजन, दीपक राठोड, सतीश बोरुडे, बाळू हंडाळ, आजिनाथ शिरसाट, कैलास भोसले आदींनी परिश्रम घेतली. प्रास्ताविक ज्ञानेश्वर गायके, सूत्रसंचालन रेश्मा सातपुते व आभार अर्चना दराडे यांनी मानले.

### यशस्वी विद्यार्थ्यांचा केला सत्कार

शाळेतील सुमित अशोक काळे याने ९७.६० गुण मिळवून पाथर्डी शहरात आणि विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. ईश्वर आदिनाथ फुंदे ९६.२० गुण मिळवून द्वितीय तर सानवी रवींद्र कासार ९४.८०% तृतीय क्रमांकाने आली. यंदा २३२ पैकी २३० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयाचा निकाल ९९.१३ टक्के लागला आहे. १८ विद्यार्थ्यांनी ९० पेक्षा जास्त गुण मिळवले. ८५ किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा फेटा, गौरवचिन्ह व पेढा भरवून सत्कार करण्यात आला.




# बालांगण

## असे असतात मॉल रोड

**जाणून घ्या**

छोट्या मित्रांनो; तुम्ही शिमला, मसूरी, मनाली किंवा नैनिताल यासारख्या हिल स्टेशनवर गेला असाल तर त्या त्या ठिकाणचा प्रसिद्ध मॉल रोड पाहिलाच असेल. हे रस्ते फक्त बाजारपेठाच नसतात तर प्रत्येक पर्यटकाला अनुभव घ्यावासा वाटणारा भाग असतो. त्यामुळेच लोक तिथे गर्दी करतात. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की, या रस्त्यांना 'मॉल रोड' का म्हणतात आणि ही परंपरा कुठून सुरू झाली? चला, आज जाणून घेऊ या.



मुलांनो, पूर्वी 'मॉल' या शब्दाचा अर्थ वेगळा होता. ब्रिटीश राजवटीत मॉल हा शब्द खुल्या आणि रुंद मार्गासाठी वापरला जात असे. हा मार्ग विशेषतः चालण्यासाठी आणि सामाजिक मेळाव्यासाठी बांधला जायचा. १८ व्या आणि १९ व्या शतकात भारत ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली असताना ब्रिटीश अधिकारी आणि त्यांचे कुटुंब उन्हाळ्याच्या हंगामात डोंगरावर जात असत. दिल्ली आणि कोलकात्याच्या कडक उन्हापासून वाचण्यासाठी ते शिमला, मसूरी आणि दार्जिलिंग सारख्या हिल स्टेशनवर जात असत. मग तिथे एक मुख्य रस्ता बांधला जायचा ज्यावरुन लोक संध्याकाळी फिरायचे, गप्पा मारायचे आणि सामाजिक जीवनाचा आनंद घ्यायचे. नंतर हेच रस्ते 'मॉल रोड' म्हणून ओळखले जाऊ लागले.

कालांतराने हे मॉल रोड केवळ ब्रिटिश अधिकाऱ्यांसाठी राहिले नाहीत तर स्वातंत्र्यानंतर ते सामान्य स्थानिक आणि पर्यटक अशा दोघांनाही आकर्षित करू लागले. स्थानिक हस्तकला, खाद्यपदार्थ, कपडे आणि सजावटीच्या वस्तू येथे मिळू लागल्या. हळूहळू हे मॉल रोड प्रत्येक डोंगराळ शहराची ओळख बनले.

तर मित्रांनो, अशाप्रकारे भारतात काही प्रमुख मॉल रोड आहेत. त्यामध्ये मसूरी मॉल रोड (उत्तराखंड) चा समावेश होतो. डोंगरांची राणी म्हणून ओळखला जाणारा मसूरीचा मॉल रोड संध्याकाळचा चहा घेण्यासाठी आणि सुंदर दृश्यांसाठी ओळखला जातो. शिमला मॉल रोड (हिमाचल प्रदेश) ब्रिटिश काळातील इमारती, जुन्या चर्च आणि सुंदर दुकानांनी सजलेला असून तो अजूनही इतिहास जपून ठेवतो आहे. त्याचप्रमाणे नैनीताल मॉल रोड (उत्तराखंड) नैनी तलावाच्या काठावर असून तो साहसी खेळ, खरेदी आणि स्वादिष्ट स्ट्रीट फूडसाठी प्रसिद्ध आहे. दार्जिलिंग मॉल रोड (पश्चिम बंगाल) चहाच्या बागांचा सुगंध, शांत वातावरण आणि दूरवर दिसणाऱ्या पर्वतांसाठी ओळखला जातो. दार्जिलिंगचा मॉल रोड प्रत्येक पर्यटकाचे मन जिंकतो.





**टेक्नो टॉक**

## असे वाढवा बॅटरी लाइफ

आजकाल सगळ्या स्मार्टफोनमध्ये शक्तिशाली प्रोसेसर आणि हाय-रेझोल्यूशन डिस्प्ले यासारखी प्रगत वैशिष्ट्ये असतात. यामुळे मोठी सोय होत असली तरी फोनची बॅटरी लवकर संपते. तथापि, काही गोष्टींची काळजी घेतल्यास डिव्हाइसचे बॅटरी लाइफ वाढवता येते. तेव्हा तुम्हीही या टिप्स अवश्य लक्षात ठेवा.

**ब्राइटनेस कमी करा**

मोबाईलची बॅटरी लाइफ वाढवण्यासाठी ब्राइटनेस कमी ठेवा. यामुळे बॅटरीचा वापर कमी होतो. यासाठी तुम्ही अॅडॉप्टिव्ह ब्राइटनेस फीचर देखील वापरू शकता. ते चालू केल्यास स्मार्टफोन बाह्य प्रकाशानुसार स्क्रीनचा ब्राइटनेस स्वयंचलितपणे सेट करेल. याचा फायदा म्हणजे तुम्हाला पुन्हा पुन्हा ब्राइटनेस नियंत्रित करावा लागणार नाही.

**कीबोर्डचे व्हायब्रेशन बंद करा**

आपण फोनमध्ये हॅप्टिक फीडबॅक (स्पर्श करताना व्हायब्रेशन) वापरतो. परंतु यामुळे जास्त बॅटरी खर्च होते. अशा परिस्थितीत फोनचे हे फीचर बंद करा. असे केल्याने बॅटरीचा वापर कमी होईल आणि बॅटरी लाइफ वाढेल.

**बॅकग्राउंड मोबाईल अॅप्स बंद करा**


बऱ्याचदा स्मार्टफोनमध्ये अॅप्स वापरतो आणि बंद करण्याचे विसरतो. पण यामुळे, अॅप फोनच्या बॅकग्राउंडमध्ये चालू राहतो. अशाने बॅटरीचा वापर वाढतो. म्हणूनच डिव्हाइसमध्ये अॅपचा वापर झाल्यानंतर ते बंद करा आणि बॅकग्राउंडमधूनही काढून टाका. यामुळे मोबाईलची बॅटरी लाइफ वाढेल.

**स्क्रीन टाइमआउट कमी करा**

बहुतेकजण स्क्रीन टाइमआउट एक किंवा दोन मिनिटांवर सेट ठेवतात. पण यामुळे बॅटरी लवकर संपते. अशा परिस्थितीत स्क्रीन टाइम आउट ३० सेकंदांवर सेट करा. यामुळे बॅटरी पॉवर वाढेल.

**जीपीएस बंद करा**

जीपीएस स्मार्टफोनची बॅटरी सर्वात जास्त वापरतो. तो सुरू ठेवल्याने बॅटरीचा वापर वाढतो. म्हणूनच वापरात नसतो तेव्हा जीपीएस बंद ठेवा. यामुळे बॅटरी पॉवर वेगाने वाढेल. याशिवाय फोनमध्ये वाय-फाय आणि ब्लूटूथही बंद ठेवा. यामुळेही बॅटरी लाइफ वाढण्यास मदत होईल.



## कचऱ्याचं काय होतं?

**नॉलेज**

छोट्यांनो, तुम्ही कचरा व्यवस्थापनाबद्दल ऐकलं असेल. तुमच्या सोसायटीतही ओला आणि सुका कचरा वेगळा करायला सांगितलं असेल. अशाप्रकारे कचरा वेगळ्या केल्यामुळे ओल्या कचऱ्यापासून खतनिर्मिती करणं सोपं जातं तर प्लास्टिक, कागद यासारख्या कोरड्या कचऱ्याचा पुनर्वापर करता येतो. आता तुमच्या घरातल्या या कचऱ्याचं नेमकं काय होतं हे जाणून घेऊ.

घराघरातून गोळा केलेल्या कचऱ्यापैकी ३२.२ टक्के कचऱ्याचा पुनर्वापर म्हणजेच रिसायकलिंग केलं जातं किंवा ओल्या कचऱ्यापासून खत तयार केलं जातं. १२.५ टक्के कचरा जाळला जातो तर जवळपास ५५ टक्के कचरा पुरला जातो. आता अशा प्रकारे कचरा पुरल्यामुळे पर्यावरणाचं खूप नुकसान होतं. महत्त्वाची बाब म्हणजे १९६० नंतर कचरा पुरण्याचं प्रमाण दुपटीने वाढलं आहे. कचरा पुरण्यामध्ये इंग्लंचा पहिला क्रमांक लागतो. रिसायकल करता न येणारा करचा पुरण्याचा निर्णय घेतला जातो. मात्र आता बऱ्याच ठिकाणी नव्या तंत्राज्ञानाचा वापर केला जात असल्यामुळे पर्यावरणाची हानी होणार नाही, याची काळजी घेतली जाते. योग्य व्यवस्थापन केल्यामुळे कचऱ्याचा चांगल्या प्रकारे उपयोग करता येतो. अनेक ठिकाणी नव्या पद्धतीचा अवलंब केला जात आहे. आपणही घरातला कचरा कमी करण्यासाठी प्रयत्न करू शकतो. तुमच्या घरात बाग असेल तर ओल्या कचऱ्यापासून घरच्या घरी नैसर्गिक खत तयार करता येईल. प्लास्टिक किंवा इतर वस्तूंचा पुनर्वापर करता येईल.



## असा असतो कोब्राचा फणा

**विचार करा**

छोट्या दोस्तांनो, तुम्हाला सापांच्या विश्वाविषयी कुतूहल वाटत असेल ना? हे स्वाभाविक आहे कारण त्यांचे जग खरोखर अनेक रहस्यांनी भरलेले आहे. कुतूहलाचा असाच एक भाग म्हणजे किंग कोब्राचा फणा. फण्याचा आकार आणि उसळून वार करण्याच्या शैलीसाठी कोब्रा जातीच्या नाग वेगळा दिसतो. तेव्हा हा फणा कसे काम करतो आणि तो इतर सापांपेक्षा कसा वेगळा आहे? हे आज जाणून घेऊ या.

मित्रांनो, कोब्राचा फणा ही एक विशेष प्रकारची शारीरिक रचना असून नागाच्या मानेभोवती असलेल्या स्नायू आणि कशेरुकांद्वारे ती नियंत्रित केली जाते. कोब्राला धोका जाणवताच मान वाढवतो आणि त्याचाच फणा तयार होतो. या प्रक्रियेत सापाच्या कशेरुकांदरम्यान असणारी हाडे आणि स्नायू एकत्र काम करत एक सपाट, पसरलेला पृष्ठभाग तयार करतात.

हा फणा कोब्राच्या शरीराच्या इतर भागांपेक्षा पूर्णपणे वेगळा दिसतो. नाग फणा पसरवताच तेव्हा केवळ त्याचा आकारच वाढवत नाहीत तर समोरच्या प्राण्याला किंवा भक्ष्याला घाबरवण्यासाठी एक भयानक प्रतिमा देखील तयार करतात. म्हणजेच संरक्षणात हा फणा म हत्त्वाची भूमिका बजावतो. एखादा शिकारी किंवा शिकार नागाजवळ येतो तेव्हा नाग फणा काढून इशारा देतो. आपण त्याच्यासाठी धोकादायक ठरु शकत असल्याचेच जणू तो सांगत असतो. नागाच्या फण्याचा आकार तो हल्ला करण्यास तयार असल्याचेही सूचित करतो. त्यामुळेच अनेक प्राणी आणि माणूसदेखील नागाला पाहून घाबरतात आणि त्याच्यापासून दूर जाण्याचा प्रयत्न करतात.

इतर सापांच्या तुलनेत नागांकडे पाहिले तर आढळेल की त्यांचा आकार सर्वात वेगळा आहे. सामान्य सापांच्या शरीरात मान नसते तसेच त्यांचा शरीराचा आकार खूप लवचिक आणि साधा असतो. दुसरीकडे कोब्राच्या शरीरात एक कठीण आणि मजबूत भाग असतो जो त्यांना फणा तयार करण्यास मदत करतो. याशिवाय इतर साप वेग, विष किंवा आकाराद्वारे आपली ओळख तसेच धोका दर्शवून देतात परंतु कोब्रा आधीच फण्याद्वारे हा संदेश देतात. फण्यामुळे कोब्राची प्रतिमा अधिक भीतीदायक होते. खेरीज फणा मादी कोब्रासाठी आकर्षणाचे कारणही असतो. नर कोब्रा फणा पसरवतो तेव्हा त्याची शक्ती आणि आकारही प्रदर्शित करतो. त्यामुळे मादी कोब्रा त्याच्याकडे आकर्षित होऊ शकतात.

## घरीच करा सरबत

**झटपट रेसिपी**

उन्हाळ्यात थंड आणि ताजेतवाने होण्यासाठी सतत काहीतरी प्यावेसे वाटते ना... पण बाजारात मिळणाऱ्या कोल्ड्रिंक्समध्ये भरपूर साखर आणि अनेक हानिकारक घटक असतात. ते आरोग्यासाठी चांगले नसतात. अशावेळी तुम्ही घरीच एक खास शरबत बनवू शकता. ते केवळ चविष्टच नाही तर आरोग्यासाठीही फायदेशीर आहे. चला तर मग, ते कसे करायचे ते जाणून घेऊ या.

मित्रांनो, बडीशेपमध्ये अनेक औषधी गुणधर्म असतात हे तुम्ही जाणता. बडीशेप पचनक्रिया निरोगी ठेवते, पोटातील उष्णता कमी करते आणि शरीर थंड ठेवते. तेव्हा अशा या बडीशेपच्या सरबताने तुमची तहान भागतेच त्याचबरोबर उन्हापासून आरामही मिळतो. हे सरबत करण्यासाठी दोन टेबलस्पून बडीशेप, एक कप साखर, चार कप पाणी आणि थोडासा लिंबाचा रस तसेच बर्फाचे तुकडे हे साहित्य घ्या.




सर्वप्रथम पाणी आणि बडीशेप एका भांड्यात रात्रभर किंवा किमान चार-पास तास भिजत ठेवा. आता भिजलेल्या बडीशेपचा सर्व अर्क पाण्यात येईल. नंतर भिजवलेली बडीशेप मिक्सर किंवा ब्लेंडरमध्ये बारीक करुन घ्या. थोडे पाणी घालून मिश्रण चांगले बारीक करा. आता स्वच्छ कापड किंवा चाळणी घ्या आणि बडीशेपचे मिश्रण गाळून घ्या. यानंतर, बडीशेपचा जाड रस बाहेर येईल आणि साले वेगळी होतील. आता एका भांड्यात बडीशेपचा रस, साखर घाला आणि चांगले मिसळून गॅसवर ठेवा. साखर विरघळली की गॅस बंद करा आणि शरबत थंड होऊ द्या. थंड झाल्यावर त्यात थोडा लिंबाचा रस घाला. यामुळे शरबत चवदार होईल. हे स्वादिष्ट बडीशेप सरबत बर्फाचे तुकडे घालून पिता येईल.

## ओळखा पाहू

**जिज्ञासा**

१) रक्ताभिसरण क्रियेचा शोध कोणी लावला?
२) राष्ट्रीय हक्क दिवस कधी असतो?
३) विजेचा सर्वात उत्तम वाहक कोण?
४) मौर्य काळातली प्रसिद्ध शैक्षणिक संस्था कोणती?
५) एनइएफटीचं पूर्णरूप काय?
६) सर्वात थंड ग्रह कोणता?
७) सर्वात छोटा खंड कोणता?
८) सर्वात मोठ्या पर्वतरांगा कोणत्या?
९) जगातला सर्वात उंच धबधबा कोणता?
१०) जगातलं सर्वात उंच धरण कोणतं?

उत्तर : १) विल्यम हार्वे २) १० डिसेंबर ३) चांदी ४) तक्षशिला ५) नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड्स ट्रान्सफर ६) युरेनस ७) ऑस्ट्रेलिया ८) हिमालय ९) एंजल फॉल्स(व्हेनेझुएला) १०) जिनपिंग १ (चीन)








## अंगभूत कौशल्ये वाढवा

**स्वयंविकास**

मित्रांनो, तुम्ही भरपूर अभ्यास करता. चांगले गुण मिळवता. पण फक्त पुस्तकी किडा असून भागत नाही. आपलं व्यक्तिमत्त्वही उठून दिसायला हवं. आपल्या अंगी काही कौशल्यं असायला हवीत किंवा अंगची कौशल्यं विकसित करायला हवीत. तुमच्या अंगी धीटपणा असायला हवा. यासाठी शाळेत तसंच सोसायटीत आयोजित होणाऱ्या स्पर्धांमध्ये सहभागी व्हा. वक्तृत्त्व, गायन, नृत्य, चर्चासत्र, विविध गुणदर्शनसारख्या स्पर्धांचं आयोजन केलेलं असतं. या स्पर्धांमध्ये तुम्ही सहभागी होऊ शकता. आंतरशालेय स्पर्धांचीही धूम असते. या स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी विशेष तयारी करावी लागते. या स्पर्धांच्या निमित्ताने तुम्ही इतर शाळेतल्या मुलांना भेटू शकता. तुमच्या मित्र-मैत्रिणींची संख्या वाढू शकते.

आंतरशालेय वक्तृत्त्व, गायन, नृत्य, वादविवाद, बुद्धीबळ अशाही स्पर्धा घेतल्या जातात. निबंध स्पर्धांचंही आयोजन केलं जातं. यातून तुम्ही तुमचे विचार मांडू शकता. वादविवाद स्पर्धेत भाग घेतल्याने भांडण न करता स्वत:चा मुद्दा पटवून देण्याचं कौशल्य तुम्ही अंगी बाणवू शकता. वक्तृत्त्व स्पर्धेत भाग घेऊन तुम्ही स्टेजची भीती घालवू शकता. एखाद्या खेळात प्रवीण असाल तर शाळेच्या संघात सहभागी होऊ शकता. बॅडमिंटन, टेनिससारख्या खेळांच्या स्पर्धांमध्ये सहभागी होऊ शकता. खो-खो, कबड्डीसारख्या खेळांसाठी शाळांचे संघ निवडले जातात. या संघांसाठीच्या निवड चाचणीत तुम्ही सहभागी होऊ शकता. अंगात चपळता असेल तर तुमची निवड होऊ शकेल. चित्रकला, हस्तकला येत असेल तर शालेय तसंच राष्ट्रीय स्तरावरच्या स्पर्धांमध्ये सहभागी होता येईल. शाळेतर्फे एखादं मासिक निघत असेल तर त्यात तुम्ही लिखाण करू शकता.

## ठिपके जुळवा



**दोस्त हे मस्त**

### असा आहे टकिन




मित्रांनो, भूतान हा आपला शेजारी देश. या देशाबद्दल आपल्याला थोडीफार माहिती असायला हवी. म्हणूनच आपण या सुंदर देशातल्या एका मुक्या दोस्ताबद्दल जाणून घेऊ. या दोस्ताचं नाव आहे टकिन. टकिन हा भूतानचा राष्ट्रीय प्राणी. टकिन हा बकऱ्यांच्या प्रजातीचा प्राणी आहे. हे प्राणी साधारण २० जणांच्या कळपात राहतात. उन्हाळ्यात ३०० जणांचा कपळही तयार होतो. टकिन डोंगराळ तसंच गवताळ भागात आढळतो. अरूणाचल प्रदेश तसंच चीनमध्येही टकिन आढळतो.

**खादाडी**

### टेस्टी नूडल्स विथ चीझ

छोट्यांनो, नूडल्स तुम्हाला आवडतातच. पण एकाच प्रकारचे नूडल्स खाऊन कंटाळा आला असेल तर तुम्ही त्याला ट्विस्ट देऊ शकता. नूडल्स विथ चीझ ही रेसिपी तुम्हाला ट्राय करता येईल.



यासाठी एक कप नूडल्स, एक कप दूध, मीठ, अर्धा चमचा मिरपूड आणि चीझ असे पदार्थ घ्या. नूडल्स शिजवून घ्या. एका कढईत दूध गरम करा. मग त्यात चीझ घाला.नूडल्स घालून दूध आटवून घ्या. मग मीठ आणि मिरपूड घालून खा.

**टेक ग्यान**

### ही पद्धत धोक्याची...

बरेच जण लॅपटॉपवर काम करता करता मोबाईल चार्ज करतात. यासाठी चार्जरची वायर लॅपटॉपला जोडली जाते.



पण यामुळे मोबाईलमधली माहिती हॅक होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा प्रकारे मोबाईल चार्ज करण्याआधी थोडा विचार करा. शक्यतो लॅपटॉपला वायर जोडून मोबाईल चार्ज करूच नका.

**समाजभान**

### उत्सव असावे इको फ्रेंडली

दोस्तांनो, सण-उत्सवांचा आनंद लुटताना पर्यावरणाचं भान राखणंही गरजेचं असतं. अगदी छोट्या छोट्या बदलांनी आपण पर्यावरणाचा जागर करू शकतो.



आपल्याला थर्माकोलचा वापर टाळता येतो. देवाला वाहिलेली फुलं तसंच इतर निर्माल्य कलशात टाकता येतं. लाउड स्पीकरचा आवाज कमी ठेऊन ध्वनी प्रदूषण टाळता येतं.